अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

आजचा रंग लाल

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.२७ सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३५८ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८





## जिल्ह्यातील दोन महिला सरपंच बेपत्ता

# कवठ्याच्या भाभींचा थांगपत्ता लागेना; सौंदरेच्या टीचर सापडल्या तरी कारण कळेना

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहरानजीक असणाऱ्या कवठे(ता. उत्तर सोलापूर) गावच्या सरपंचभाभी अचानक गावातून बेपत्ता झाल्या. नातेवाईक, गावकरी आणि पोलीस आकाशपाताळ एक करून शोध घेत असले तरी त्यांचा थांगपत्ता लागेना. ही घटना ताजी असतानाच सौंदरे(ता. बार्शी, जि. सोलापूर) येथील महिला सरपंचही अचानक गावातून गायब झाल्या. त्यांना ग्रामीण पोलिसांनी शोधून काढले असले तरी त्यांच्या गायब होण्याचे कारण मात्र पोलिसांनाही सापडेना. कोण म्हणतेय गावकऱ्यांच्या त्रासाला कंटाळून गेल्या, कोण म्हणतेय राजकारणाला वैतागून गेल्या. पोलिसांचा तपास प्राथमिक अवस्थेत असल्यामुळे कोणाचेच कोणाला कळेनासे झाले आहे.**




गेल्या वीस दिवसांपूर्वी कवठे (ता.उत्तर सोलापूर) गावच्या सरपंचभाभी अचानक गावातून गायब झाल्या. त्यांचे नातेवाईक, गावकरी, सोलापूर शहर पोलीस रात्रंदिवस त्यांचा शोध घेत आहेत. मात्र त्यांचा पत्ता लागला नाही. ही घटना ताजी असतानाच सौंदरे गावच्या सरपंच शुक्रवारी अचानक गायब झाल्या. पेशाने शिक्षक असणाऱ्या सरपंचबाई अचानक गावातून गायब झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांसह गावही हादरले. खबर मिळताच पोलीस यंत्रणाही हादरली. मात्र त्यानंतर अवघ्या ४८ तासात त्यांचा शोध लागला आणि पोलिसांनी त्यांना रत्नागिरीतून ताब्यात घेऊन कुटुंबीयांच्या स्वाधीन केले.

**शाळेतून घरी परत आल्याच नाहीत**

सौंदरेच्या महिला सरपंच ह्या बार्शी शहरातील एका शाळेत शिक्षिका आहेत. नेहमीप्रमाणे त्या शुक्रवारी सकाळी शाळेला गेल्या. मात्र शाळा सुटल्यानंतर त्या घरी परतल्याच नाहीत. त्यामुळे सायंकाळी त्यांच्या कुटुंबीयांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलीस यंत्रणा कामाला लागली.

### सोशल मीडियामुळे रत्नागिरीत लागली खबर

सरपंचबाईंचा फोटो आणि माहिती राज्यातील सर्वच पोलीस ठाण्यांना कळवली. शिवाय ही बाब सोशल मीडियावरही व्हायरल झाली. सोशल मीडियावरील पोस्ट रत्नागिरी जिल्ह्यापर्यंत पोहचली. त्यामुळेच सरपंचबाई ह्या रत्नागिरीतील एका मठात असल्याची खबर दापोली पोलिसांमार्फत सोलापूर ग्रामीण पोलिसांपर्यंत पोहचली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ हालचाल करून सरपंचबाईंना ताब्यात घेऊन कुटुंबीयांच्या स्वाधीन केले.

### महिला आयोगाने घेतली दखल

दरम्यान, सौंदरेच्या सरपंचबाई गायब असल्याची माहिती राज्य महिला आयोगापर्यंत पोहचली होती. आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी ट्वीट करून सरपंचबाईंना त्रास देणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले होते. त्यामुळे पोलीस यंत्रणेने वेगवान हालचाली केल्या. दापोली पोलिसांचीही सतर्कता कामाला आली आणि सरपंचबाईंचा शोध लागला.

### कारण कळेना...

दापोली पोलिसांकडून खबर मिळताच बार्शी शहर पोलिसांनी रत्नागिरी जिल्ह्यातील एका आश्रमातून सरपंचबाईंना ताब्यात घेऊन त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले आहे. अद्याप सरपंचबाईंकडे कसलीही चौकशी केलेली नाही. त्यांचा प्राथमिक जबाबही अद्याप नोंदवण्यात आलेला नाही. येत्या एक दोन दिवसांत त्यांचा जबाब नोंदवला जाईल. त्यानंतरच या प्रकरणाचा उलगडा होईल, असे बार्शी शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अण्णाराव मांजरे यांनी सांगितले.

---

## संत साहित्याचे अभ्यासक डॉ.रामचंद्र देखणे यांचे निधन

✔ पुणे : संतसाहित्याचे आणि लोकवाङःमयाचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ भारूडकार डॉ. रामचंद्र अनंत देखणे (६६ वर्षे) यांचे सोमवारी सायंकाळी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. घटस्थापनेमुळे डॉ. देखणे हे शनिवार पेठेतील घरीच होते. सायंकाळी सातच्या सुमारास त्यांना



हृदयविकाराचा झटका आला. कुटुंबीयांनी तातडीने त्यांना खासगी रुग्णालयात नेले. परंतु, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. डॉ. देखणे यांचा फिटनेस चांगला होता. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी अंत्यसंस्कार होणार आहेत. चार दिवसांपूर्वीच ते गणेश कला क्रीडामध्ये नवचैतन्य हास्ययोग परिवाराच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हास्य, आनंद आणि तत्त्वज्ञान या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला होता.

## भर पावसात, भक्तीमय वातावरणात, शक्तीदेवीची प्रतिष्ठाना उत्साहात

✔ सुराज्य/सोलापूर

आई राजा उदे उदे चा गजर, लेझीम, झांज, टिपऱ्यांचा सुरेख खेळ, गुलालाची मुक्त उधळण, डौलाने फडकणारे भगवे ध्वज अशा उत्साही आणि भक्तिमय वातावरणात वाजत गाजत मिरवणुका काढून सोमवारी सोलापूर शहर व परिसरात विविध सार्वजनिक शक्तिदेवी उत्सव मंडळांनी शक्तिदेवी मूर्तीची प्रतिष्ठापना केली.

शहर व परिसरात सुमारे ४०० सार्वजनिक मंडळांनी शक्तिदेवींची प्रतिष्ठापना केली. मानाच्या श्री रूपाभवानी मंदिरात दुपारी घटस्थापनेने नवरात्र उत्सवात प्रारंभ झाला. त्यानंतर आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. वारद चाळीतील देवीच्या मिरवणुकीचा प्रारंभ माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. भावसार समाजाची कुलदेवता श्री हिंगुलांबिका माता, उत्तर कसब्यातील कालिकादेवी माता, लाड तेली समाजाची जगदंबा माता, गोंधळी समाजाची श्री इंद्रभवानी माता आदी विविध





**■ मिरवणुकांनी वेधले लक्ष**

सकाळपासून सार्वजनिक शक्तिदेवी मंडळाच्या प्रतिष्ठापनेच्या मिरवणुका सुरू होत्या. पांजरापोळ चौक, बाळी वेस, नवी पेठ, माणिक चौक, पूर्व भाग आदी ठिकाणी मिरवणुकांनी रस्ते फुलून गेले होते. बाळीवेस लोणारी गल्लीतील शिवशक्ती मंडळाच्या लेझीम पथकाने सुंदर कलाविष्कार सादर केला. पांजरापोळ चौकातील शिवस्मारक मंडळ, नव्यापेठेतील शक्तिपूजा मंडळ, जयहिंद चौक नवरात्रौत्सव मंडळाच्या मिरवणुका उत्साही वातावरणात पार पडल्या.

**■ तुळजापूरात पाऊस तरी भाविकांमध्ये उत्साह**

नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी तुळजापूरसह अनेक ठिकाणी पाऊस झाला. तरी भाविकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. पावसाचा मिरवणूक आणि ज्योत घेऊन जाणाऱ्या भाविकांवर कोणताही परिणाम झाला नाही. तुळजाभवानीच्या दर्शनासाठी भर पावसातही भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

शक्तिदेवींच्या मूर्तीची पारंपरिक पद्धतीने प्रतिष्ठापना करण्यात आली. घरोघरी घटस्थापनेचे विधी दुपारपर्यंत चालू होते. सर्वत्र भक्तिमय वातावरण दिसून आले. गणेशोत्सवाच्या तुलनेने नवरात्रौत्सव साजरा करण्याची सोलापूरची परंपरा आहे. रस्त्यावर भाविकांची गर्दी वाढल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तनात करण्यात आला.



## पुळूजवाडी येथे आरती करताना कुऱ्हाडीने हल्ला

✔ सुराज्य/सोलापूर

गावात देवीची आरती करताना अज्ञात कारणावरून कुऱ्हाड काठी आणि दगडाने केलेल्या मारहाणीत एक जण जखमी झाला. ही घटना पुळूजवाडी (ता. पंढरपूर) येथे आज सोमवारी घडली.

लक्ष्मण बसण्णा कुडगे (वय ३६ रा. पुळुजवाडी) असे जखमीचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते आज सकाळी दहा वाजेच्या सुमारास गावात देवीची आरती करीत होते. त्यावेळी लहू कांबळे आणि अन्य तिघांनी त्यांना काठी आणि दगडाने मारहाण करीत डोक्यात कुऱ्हाडीने हल्ला केला. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## कोळेगावात पेट्रोल ओतून खुनाचा प्रयत्न

### दोघा सख्ख्या भावावर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

आदल्या दिवशी झालेल्या तक्रारीचा राग धरून तंटामुक्त अध्यक्षाच्या भावाला काठीने मारहाण करून त्यांच्या अंगावर पेट्रोल ओतून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना कोळेगाव (ता.माळशिरस) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात वेळापूरच्या पोलिसांनी दोघा सख्ख्या भावाविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

सुनील शंकर जाधव (वय ५२ रा. कोळेगाव) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रविराज सुखदेव कांबळे- कोळी आणि त्याचा भाऊ राहुल सुखदेव कांबळे ऊर्फ कोळी(रा.कोळेगाव) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेच्या आदल्या दिवशी सुनील जाधव आणि कांबळे बंधूत तक्रार झाली होती. त्यावेळी जाधव यांचे तंटामुक्तीचे असलेले बंधू यांनी दोघांची तक्रार मिटवली होती. त्याचा राग त्यांना होता.




शनिवारी रात्रीच्या सुमारास सुनील जाधव हे दूध टाकून भाळवणी रोडने दुचाकीवरून आपल्या घराकडे निघाले होते. त्यावेळी त्यांची दुचाकी अडवून कांबळे बंधूनी तू तंटामुक्त अध्यक्षाचा भाऊ आहे का, गावात लई पुढे पुढे करतो. आमची तक्रार पोलिसाकडे करतो काय असे म्हणत काठीने बेदम मारहाण केली. आणि त्याच्या अंगावर पेट्रोल ओतून आग लावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी जाधव हे पळत जाऊन पारसे यांच्या घरात आश्रय घेतला. आणि मोबाईल वरून गावातील लोकांशी संपर्क साधला. तोपर्यंत आरोपी पसार झाले होते. अशा आशयाची फिर्याद त्यांनी पोलिसात दाखल केली. पुढील तपास फौजदार तनपुरे हे करीत आहेत.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सत्तेचा लोभ आम्हा नाही..!

| कल्याण |
| --- |
| --------- |

| मेन बाजार |
| --- |
| --------- |

# सपाटेंच्या प्रकरणाचा प्रसारमाध्यमांमध्ये 'विस्फोट'

### कारवाईसंदर्भात गॉडफादर मात्र तटस्थ

✔ सुराज्य/शिवाजी भोसले

सोलापूरचे माजी महापौर आणि राष्ट्रवादीतील ज्येष्ठ नेते मनोहर सपाटे यांच्या संबंधीच्या तथाकथित प्रकरणाचा विस्फोट प्रसारमाध्यमांमध्ये झाला असला तरी, पक्षाचे हायकमांड आणि सपाटे यांचे गॉडफादर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मात्र पक्षांतर्गत कारवाई करण्याच्या संदर्भात कोणतीही भूमिका सोमवारी स्पष्ट केली नाही, शिवाय सपाटेंच्या नाजूक प्रकरणात त्यांना पाठीशी घालण्याचा शब्दही दिला नाही.

अत्यंत अडचणींच्या परिस्थितीत सहकार्य केले जावे, या संदर्भातील भ्रमणध्वनी सपाटे परिवारातील सदस्यांनी खुद्द शरद पवार यांना केले.

मात्र शरद पवार यांनी वस्तुस्थिती जाणून घेतली, सहकार्य करू या, असा कोणताही शब्द पवार यांनी सोमवारी तरी दिला नाही असे सपाटे यांच्या अत्यंत निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले. दुसरीकडे सपाटे यांना ताब्यात घेण्यासाठी पोलिसांची पथके फिरत असून सोमवारी दिवसभरात सपाटे यांचा पोलिसांना थांगपत्ता लागला नाही असे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले. शिवाय सपाटे यांच्यावरील अटकेची कारवाई

## चर्चेचे धूमशान कायम; अटकपूर्व जामीनासाठी सपाटे परिवाराची धावाधाव

ही अटळ असल्याचे मानून त्यांच्या परिवारातील सदस्यांनी आज सोमवारीच वरिष्ठ कायदेतज्ज्ञांशी चर्चा करून सल्लामसलत घेण्याचा प्रयत्न केल्याची देखील माहिती निकटवर्तीयांकडून देण्यात आली. संस्थेतील एका विधवा महिलेवर अत्याचार केल्याचे प्रकरण व त्या आनुषंगिक, सपाटे यांच्यावर झालेला गुन्हा दाखल या सगळ्या पार्श्वभूमीवर, सोलापूर शहर आणि जिल्ह्यात चर्चेला ऊत आला आहे.



या प्रकरणात सपाटे यांच्यावर पक्षातून कोणती कारवाई होणार? त्यांचे हायकमांड शरद पवार तसेच अजित पवार हे कोणती भूमिका घेणार? त्यांच्या पाठीशी उभे राहणार का? त्याशिवाय पक्षाची बदनामी होईल म्हणून पाटील यांना पक्षातून बाजूला करणार यासंदर्भातील तर्क वितर्काच्या चर्चेला उधाण आले आहे.

सपाटे यांच्या विरोधकांमध्ये मात्र आनंदाच्या उकळ्या फुटत आहेत, पक्षातून बाजूला करण्याची कारवाई व्हायलाच हवी, शिवाय त्यांना अटक करण्यात यावी हीच धारणा विरोधकांची आहे.

**विद्या लोलगेंची मनधरणी :** कथित अत्याचार प्रकरणात दाखल झालेल्या गुन्ह्यावर 'अभय' मिळावे, पक्षातून कोणतीच कारवाई केली जाऊ नये, शिवाय अटक होऊ नये, यासाठी 'वजन' वापरण्यात यावे, या सगळ्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या 'वजनदार' नेत्या तसेच शरद पवार यांच्या अत्यंत निकटवर्तीय आणि विश्वासू सहकारी विद्या लोलगे यांची मनधरणी सपाटे परिवाराकडून केली जात आहे, अशी चर्चा आहे. विद्या लोलगे यांनी या प्रकरणात मध्यस्थी करावी शरद पवारांना या प्रकरणात मदत करण्यास भाग पाडावे, अशी सपाटे परिवाराची इच्छा आहे, त्यानुसार लोलगे यांच्याशी सोमवारी प्राथमिक बोलणी झाली, अशी ही चर्चा आहे. तथापि लोलगे यांनी सपाटे परिवाराला कोणताच शब्द दिला नाही, असेही सांगण्यात आले.

**प्रदेश पातळीवर गंभीर दखल :** सपाटे यांच्या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश पातळीवर मात्र या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे, असे कळते. सपाटे यांना पक्षात ठेवले, त्यांना सहकार्य केले. तर पक्षाच्या संदर्भात काय मेसेज जाईल? याची चाचपणी केली जात आहे, शिवाय सपाटे यांच्या संदर्भात संपूर्ण अहवाल मागून घेतला आहे, त्याचबरोबर त्यांना पक्षाच्या कोणत्याही कार्यक्रमाला बोलावण्यात येऊ नये, सहभागी करून घेऊ नये, असे सक्त आदेश देण्यात आल्याची माहिती आली आहे.

# संघर्षाचा नवा ड्रामा

राजस्थान काँग्रेसमध्ये अशोक गेहलोत-सचिन पायलट यांच्यातील संघर्षाचा नवा ड्रामा पुन्हा सुरू झाला. गेहलोत हे काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याने पायलट हे मुख्यमंत्रिपदी भरारी घेण्याचे संकेत असताना राजस्थानात या नव्या नाट्याचा आरंभ झाला. राज्यात काँग्रेसचा नवा 'पायलट' कोण या प्रश्नाबरोबरच पक्षाला राज्यातील सत्ता गमवावी लागणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पक्षाध्यक्षपदासाठी राहुल गांधी यांची मनधरणी करण्याचा शेवटचा प्रयत्न असफल ठरल्याने गेहलोत यांनी या पदासाठी रिंगणात उतरणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यानुसार विधिमंडळ पक्षाच्या नव्या नेत्याच्या निवडीसाठी रविवारी सायंकाळी ७ वाजता आमदारांची बैठक बोलावण्यात आली होती. मात्र, गेहलोत समर्थक आमदारांनी या बैठकीकडे पाठ फिरवत विधानसभा अध्यक्ष सी. पी. जोशी यांचे निवासस्थान गाठले. तिथे जवळपास ९२ आमदारांनी राजीनामा देण्याची तयारी दर्शवली. त्यातील अनेकांनी राजीनामाही दिला. या आमदारांचे प्रतिनिधी म्हणून प्रतापसिंह खाचरियावास आणि शांती धारिवाल यांनी गेहलोत यांच्या निवासस्थानी केंद्रीय निरीक्षक अजय माकन आणि मल्लिकार्जुन खरगे यांची भेट घेतली. त्यात आमदारांच्या भावना केंद्रीय निरीक्षकांना कळविण्यात आल्या. मात्र, तिढा कायम राहिला. गेहलोत यांच्याकडे पक्षाध्यक्षपदाबरोबरच मुख्यमंत्रिपद कायम राहावे, अशी त्यांचे समर्थक असलेल्या आमदारांची भूमिका आहे. त्यासाठी 'एक व्यक्ती, एक पद' या नियमातून गेहलोत यांना सूट द्यावी, असे त्यांचे मत आहे. ते शक्य नसेल तर सचिन



पायलट यांच्याऐवजी गेहलोत समर्थक आमदाराला मुख्यमंत्री बनवावे, अशी त्यांची मागणी आहे. अध्यक्षपदाबरोबरच मुख्यमंत्रिपद स्वत:कडेच ठेवण्याची गेहलोत यांची इच्छा आहे. एक व्यक्ती दोन पदे भूषवू शकते, असे गेहलोत काही दिवसांपूर्वी म्हणाले होते. मात्र, राहुल गांधी यांनी उदयपूर घोषणापत्रानुसार 'एक व्यक्ती, एक पद' हा नियम पाळणे अपेक्षित असल्याचे स्पष्ट करताच गेहलोत यांनी सूर बदलला होता. मात्र, अद्यापही मुख्यमंत्रिपद सोडण्याची गेहलोत यांची मानसिक तयारी नसल्याचे दिसते. गेहलोत यांना पक्षाध्यक्षपदासाठी गांधी कुटुंबाची पसंती असल्याचे मानले जाते. मात्र, पक्षाध्यक्षपदाच्या रिंगणात उतरल्यानंतर मुख्यमंत्रिपदाचा त्याग करावा लागणार असल्याने अध्यक्षपदासाठी ते उत्सुक नसल्याची चर्चा आहे. पक्षाध्यक्षपद मिळाल्यानंतरही सारी सूत्रे गांधी कुटुंबाकडे राहतील आणि दुसरीकडे राजस्थानातील आपल्या वर्चस्वालाही धक्का बसेल, अशी भीती गेहलोत यांना असावी. गेहलोत यांना बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा असल्याचे २०१८मध्ये सत्ता स्थापन करताना आणि नंतर २०२०मध्ये पायलट यांच्या बंडावेळीही स्पष्ट झाले होते. आता खांदेपालट करावा लागणार असल्याने विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नवे नेतृत्व निवडण्याचे सर्वाधिकार पक्षनेतृत्वाकडे सोपविण्याचा एका ओळीचा प्रस्ताव आणण्यात येईल, असे गेहलोत यांनी सूचित केले होते. प्रत्यक्षात त्यांचे समर्थक आमदार बैठकीकडे फिरकलेच नाहीत. शिवाय, त्यातील अनेकांनी राजीनामा दिला. या छापील राजीनाम्याचे स्वरूप सारखेच आहे. त्यामुळे राजीनामास्त्र ही पूर्वनियोजित खेळी असून, या सत्तानाट्याला गेहलोत यांची फुस असल्याचे मानले जाते. मुख्यमंत्रिपदासाठी पक्षनेतृत्वाचा कौल सचिन पायलट यांना असल्याचे ज्ञात असल्याने गेहलोत यांनी आपल्या मर्जीतील आमदाराला मुख्यमंत्री बनवण्यासाठी हे दबावतंत्र अवलंबल्याचे चित्र आहे. काँग्रेसचा तरुण चेहरा असलेले पायलट हे मुख्यमंत्रिपदाचे प्रबळ दावेदार मानले जात होते. मात्र, गेहलोत समर्थक आमदारांच्या बंडामुळे अनेक नावे चर्चेत आहेत. गेहलोत निष्ठावान असणे ही त्यांच्यासाठी जमेची बाजू आहे. मात्र, ऐन वेळी अन्य आमदाराचेही नाव पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. केवळ गेहलोत समर्थक ही त्यासाठीची पूर्वअट असेल. २०१३च्या विधानसभा निवडणुकीत गेहलोत यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा दारुण पराभव झाला होता. २०० सदस्यांच्या विधानसभेत पक्षाला फक्त २१ जागा जिंकता आल्या. त्यामुळे जानेवारी २०१४मध्ये सचिन पायलट यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपद सोपविण्यात आले. पायलट यांनी पाच वर्षे राज्यभर दौरे काढून २०१८च्या निवडणुकीत पक्षाला विजय मिळवून दिला. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाची माळ पायलट यांच्या गळ्यात पडेल, असे चित्र दिसत होते. मात्र, काठावरच्या बहुमतामुळे पक्षनेतृत्वाने अनुभवी गेहलोत यांना मुख्यमंत्रिपदासाठी पसंती दिली आणि पायलट यांना उपमुख्यमंत्रिपद दिले. त्यामुळे उमेदवार ठरविण्यावरून या दोघांमध्ये निर्माण झालेल्या संघर्षात भर पडली. पायलट यांनी २०२०मध्ये बंडाचा प्रयत्न केला. पण तो फसला.यावेळेस तरी पायलट यांचे स्वप्न पूर्ण होणार काय?

अध्यात्म

# नवरात्रीतले नऊ रंग...

**नवरात्रीतले नऊ रंग धार्मिक नाहीत, हा तर होता मार्केटिंगचा फंडा. नवरात्र आलं की सरडासुद्धा जितक्या झटपट रंग बदलणार नाही, तितक्या झटपट या बायका येत्या नऊ दिवसांत रंग बदलतील हा बायकांच्या रोज वेगवेगळ्या रंगांच्या साड्या नेसण्यावर कमेंट करणारा जोक येतोच येतो. पण स्त्रिया आपल्या महाधीट. असल्या फालतू जोकला मुळीच भीक न घालता तेवढ्यात उत्साहाने ठेवणीतल्या साड्या नेसून ऑफीसला जायला निघतात. काहीजणी आणि काहीजणसुद्धा हा रंग म्हणजे अगदी जिवापाड पाळतात. कधी त्या निमित्तानं नव्या खरेदी सुद्धा होतात. काही लोकांची नाहीतरी एरवी तेरवी कपडे घालायचे असतातच ना, मग घालू आजचा रंग अशी भावना असते.**

तात्पर्य काय, मनापासून किंवा गंमत म्हणून महाराष्ट्रात बरीचशी जनता हे रंगांचं फॅड एंजॉय करते. पण तुम्हांला कधी प्रश्न पडलाल का? की कोण ठरवतं हे रंग म्हणून? किंवा याच दिवशी हाच रंग घालायचा ही परंपरा कितीशे वर्षांपासून चालत आली आहे म्हणून? हो. उत्तर आणि त्यामागची कथा मोठी रंजक आहे.

२००३ च्या सुमारास एका वृत्तपत्राने श्रावणक्वीन आणि नवरात्रीचे नऊ रंग हा प्रकार चालू केला. पहिले दोन-तीन दिवस पुरवणीमध्ये त्या दिवसाच्या रंगाच्या सुंदरशा साडीमधल्या मॉडेलचे फोटो हे आकर्षण होतं. मग आलं तुमच्याही ऑफिसमध्ये सगळ्यांनी एकाच रंगाचे कपडे घातल्याचे फोटो पाठवा म्हणून आवाहन. मग काय, बँका, शाळा , ऑफिसेस मधल्या ग्रुप फोटोजनी मटा पुरवणीची मधली दोन आणि कधी कधी शेवटचं पानही खाऊन टाकलं. नऊ रंग हे धर्म-संस्कृतीशी अजिबात संबंधित नव्हते, पण ते तसे जोडण्यासाठी गोष्टी रचल्या गेल्या.

२००३-०४ साली फक्त जाहिरातींतूनच नाही, तर अशा फोटोजमधूनही बातम्या हुडकून हुडकून वाचाव्या लागत होत्या. बघा, केवढं दिव्य होतं ते. तर त्याच्या म्हणण्याप्रमाणं त्यांनी केलं काय? तर प्रत्येक दिवस एका देवीचा असे नऊ देवींमध्ये नऊ दिवस वाटून टाकले. आणि मग प्रत्येक देवीला एक रंग दिला. म्हणजे असं पाहा, दुर्गेची दुर्गाष्टमी, म्हणून तिचा एक रंग. असा रंगोत्सवाला मस्त धार्मिकतेचा रंग चढत गेला. खरं असो वा नसो, उत्सवप्रिय भगिनींनी आणि काही बंधुरायांनीही हा सण नवरंगात साजरा करायला सुरुवात केली. हळूहळू दरवर्षी लोक वृत्तपत्राने रंग जाहीर करण्याची वाट पाहू लागले. आता तर काय, रोजचं शेड्यूल व्हॉटस्‌ॲपवर केलं जातं. पण प्रश्न असा होता की, त्यांनी असा अचरटपणा का करावासा वाटला? आणि यावर्षी माझ्या हाती आला क्विंटचा लेख.

ते म्हणाले, 'यात धार्मिकता वगैरे काही नाही, तर लोकसत्तेच्या तुलनेनं घसरत चाललेला वृत्तपत्राचा खप वाढवण्यासाठी त्यांनी केलेली ही मार्केटिंग स्ट्रॅटेजी होती. तर त्यांनी हेरला ऑफिसला जाणाऱ्या मध्यमवयीन बायकांचा वाचकवर्ग आणि त्यांना आकर्षित करण्यासाठी मग फोटोज, छान छान साडीतल्या मॉडेल्स हे सगळं रोजच्या पुरवणीत येऊ लागलं... ही त्यांची ट्रिक मात्र कमालीची यशस्वी ठरली. आजच्या घडीला ऑफिसमध्ये जाणाऱ्या मध्यमवयीन बायकाच काय, घरी येणारी कामवाली आणि कॉलेजला जाणारी मुलं-मुली देखील हे कलर कोड्स पाळतात.




सहज म्हणून सुचलेला हा मार्केटिंगचा उपाय आज १६ वर्षांनंतरही तितक्याच यशस्वीपणे चालू राहिलाय. आजच्या घडीला गणेशोत्सवात मुंबईचे गणपती नाही पाहिले तरी चालतील, पण नवरात्रात मुंबईच्या लोकल्सचे प्लॅटफॉर्म, ऑफिस, शाळेत, वेगवेगळी ठिकाणे, गावागावात मात्र नक्कीच पाहण्यासारखे झालेत. पण सर्व स्त्रियांना एक विनंती तुमच्या कर्तृत्वाचे रंग यापेक्षा जास्त देखणे आहेत हे नक्की! मजा म्हणून, एंजॉय म्हणून ठीक आहे हो. फक्त त्याचे परंपरा, संस्कृतीत परिवर्तन होऊ नये म्हणजे मिळवलं. निरागसता टिकून राहावी, कर्मकांड होऊ नये. विशिष्ट रंग घालून न आलेल्या स्त्रीला ऑड-वुमन-आऊट म्हणून ट्रीट करू नये.

**- प्रा. तात्यासाहेब काटकर, अकलूज.**


# शिक्षण व वैद्यकीय क्षेत्रातील दीपस्तंभ

## डॉ. बी. वाय. यादव

**बार्शी तालुक्याच्या सार्वजनिक व संस्थात्मक जीवनातील 'एक देवमाणूस' अशी ज्येष्ठ शल्यकर्मी डॉ. बी.वाय. यादव यांची प्रतिमा आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे गेली तीन दशके बिनविरोध अध्यक्षपद भूषविणारे आदर्श शिक्षण संस्थाचालक आणि डॉ. जगदाळेमामा हॉस्पिटलच्या माध्यमातून ट्रॉमा युनिट सारखा पिढ्यांन्‌पिढ्या उपयोगी ठरणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी अहोरात्र ध्यास घेतलेले चेअरमन हे त्यांच्या आजपर्यंतच्या कार्याचे मानबिंदू आहेत.त्यांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त..**

बार्शीचे धार्मिक महात्म्य देशभरात वाढविणाऱ्या श्री भगवंत देवस्थान समितीचे अध्यक्ष तसेच इंडियन रेडक्रॉस सोसायटी पासून कॅन्सर हॉस्पिटलपर्यंत आणि इंडियन सर्जिकल सोसायटीपासून विवेकानंद केंद्रापर्यंत अनेक संस्थांचे ते आधारवड राहिले आहेत. कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबात जन्माला येऊन कमवा आणि शिका सारख्या योजनेतून काम करत शिक्षण घेताना खडतर पायवाट तुडवत बार्शीपासून मिरज व मुंबईपर्यंत अनेक शहरात अनुभवांचे धडे गिरवत डॉ. यादव यांनी स्वत:ला घडविले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचा परीसस्पर्श त्यांना लाभला. बार्शीमध्ये पायाभूत सुविधांच्या प्रचंड कमतरतेच्या काळात व वैद्यकीय साधनांच्या अभावग्रस्ततेमध्ये केवळ शल्यकर्मातील निपुणतेमधून डॉ. यादव यांनी स्वत:ची ओळख निर्माण केली. नि:स्पृह रुग्णसेवा आणि प्रखर सामाजिक जाणिवा यावर आधारीत शल्य कर्म सेवा डॉ. यादव यांनी समाजाला दिली. गरिबांचे डॉक्टर म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत अवघड आणि गुंतागुंतीच्या प्रसंगातून वाट काढत आजपर्यंत असंख्य रुग्णांना डॉ. यादव यांनी नवजीवन दिले.

वैद्यकीय सेवा करतानाच त्यांनी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ व डॉ. जगदाळेमामा हॉस्पिटलच्या कार्यबाहुल्याची ही जबाबदारी नि:स्वार्थीपणे सांभाळली. आज डॉ. यादव यांच्या नेतृत्वाखाली ही शिक्षण संस्था राज्याच्या शिक्षणक्षेत्रात दैदिप्यमान ठरेल, असे कार्य करत आहे. राज्यापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात कार्यरत हजारो गुणवंत विद्यार्थी घडविणाऱ्या या संस्थेच्या प्रगतीमय वाटचालीत डॉ. यादव यांच्या शैक्षणिक विकास दृष्टीचा सिंहाचा वाटा आहे. सर्व विश्‍वस्तांना बरोबर घेऊन अत्यंत सर्वसमावेशकतेने संस्थेचा कार्यभार सांभाळताना डॉ. यादव यांनी आधुनिक काळाची गरज ओळखून परिपूर्ण व्यक्तिमत्त्व विकास आणि ज्ञानदान करणाऱ्या संस्थेच्या अनेक शाखांचे जाळे पश्‍चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात वाढविले. डॉ. जगदाळेमामा हॉस्पिटलच्या विविध आरोग्यशाखा व उपचार विभाग यांच्या विस्तारात डॉ. यादव यांची वैद्यकीय ज्ञानदृष्टी उपयुक्त ठरली आहे. गेली दोन दशके डॉ. यादव यांनी अत्यंत ध्यासमग्न होऊन ध्येयवादी दृष्टिकोनातून ट्रॉमा युनिटचे महाकाय आव्हान पेलत ते पूर्णत्वापर्यंत आणले आहे.



भगवंत देवस्थानचा कायापालट डॉ. यादव यांच्या श्रद्धा आणि धार्मिकतेमधून झाला आहे. साधेपणा, विनम्रता, निरपेक्षता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्व आणि कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये आहेत. शांत आणि धीरगंभीर स्वभावाचे डॉ. यादव हे त्यांच्या उदारमतवादी आणि सहिष्णू विचारसरणीमुळे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून बार्शीकरांच्या मनात ठसले आहे. संस्थाजीवनात अनेक चढउतार येतात. पण डॉ. यादव हे स्थितप्रज्ञ आहेत. तालुक्यात कोणत्याही क्षेत्रातील न्यायनिवाड्यात त्यांचा शब्द अंतिम मानला जातो. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी अद्वितीयच आहे. भारतीय संस्कार केंद्रापासून भगवंत नागरी सारख्या अर्थसंस्थापर्यंत अनेक संस्था त्यांच्या शिस्तबद्ध कार्यप्रणालीतून वाटचाल करत आहेत. त्यांच्या पत्नी डॉ. मिराताई या नामवंत स्त्रीरोगतज्ञ तर चिरंजीव डॉ. पुष्कराज हे प्रख्यात युरोसर्जन व स्नुषा डॉ. स्मिता या कुशल स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र तज्ञ आहेत.


आज सात्त्विक पुरुषार्थ आणि निष्काम कर्मयोग यांची यशस्वी सांगड घालणारे डॉ. यादव कृतज्ञ आणि कृतार्थ जीवन जगत आहेत. ७८ वर्षे ओलांडतानाही ते तरुणांनाही लाजवेल अशा कार्यमग्नतेमध्ये असतात. गेली दोन वर्षे कोरोनाने बार्शीचे समाजजीवन व्यापले असताना डॉ. यादव यांनी कोणत्याही धोक्याची पर्वा न करता कोरोना प्रतिबंधक उपचार नियोजनामध्ये सर्व शासकीय बैठकींना आपले कुशल मार्गदर्शन केले. सरकारी आणि खाजगी पातळीवरील कोरोना उपचार केंद्रांना डॉ. यादव यांनी दिशादर्शन केले.

वैद्यकीय क्षेत्राची जबाबदारी व आपली सेवाज्येष्ठता लक्षात घेत डॉ. यादव यांनी या काळात समाज व वैद्यकीय व्यावसायिक यांच्यातील समन्वय साधणारा महत्त्वाचा दुवा म्हणून काम केले. बार्शीच्या समाजकारणातील विविध विकास प्रकल्पांच्या शुभारंभांना डॉ. यादव यांची उपस्थिती ही त्यांच्या सेवाभावी दृष्टिकोनाचे व त्यांच्यावरच्या बार्शीकरांच्या अतूट विश्‍वासाचे प्रतीक असते. डॉ. यादव यांचे आजपर्यंतचे जीवन हे या शहराची सर्वक्षेत्रातील उंची वाढवणारे ठरले आहे. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. त्यांना पद्मश्री मिळण्यासाठी बार्शीच्या लोकप्रतिनिधी व सर्वक्षेत्रातील समाजधुरीणांनी पुढाकार घ्यावा, अशीच अपेक्षा. डॉ. यादव यांना भावी वाटचालीत दीर्घायुरारोग्य लाभावे, या सदिच्छा!

**- सचिन अपसिंगकर, बार्शी.**

बोधकथा

## आत्मनियंत्रणाचे महत्त्व



एक जिज्ञासूवृत्तीचा मुलगा होता. तो कोणतीही नवी गोष्ट शिकण्यास तयार होत असे. त्याने धनुष्यबाण तयार करण्यास ते कसे तयार करतात हे शिकून घेतले. नाव बनवणाऱ्यांकडून नाव, घराचे बांधकाम, बासरी बनविणे इ. प्रकारात तो निपुण झाला. परंतु त्याच्यात अहंकार आला, तो आपल्या मित्रांना सांगत असे. या जगात माझ्याइतका प्रतिभावंत अन्य कोणी नसेल.

एकदा या शहरात बुद्धांचे आगमन झाले. त्यांनी जेव्हा या मुलाची कला आणि अहंकाराबाबत ऐकले. तेव्हा त्यांना वाटले, 'या मुलाकडून आपण अशी कला शिकून घ्यावी, जी आतापर्यंतच्या कलांमध्ये श्रेष्ठ असेल. ते भिक्षापात्र घेऊन त्याच्याकडे गेले.'

मुलाने विचारले, 'तुम्ही कोण आहात? बुद्ध म्हणाले, 'मी शरीरावर नियंत्रण ठेवणारा माणूस आहे. मुलाने यावर त्यांना खुलासा विचारला असता बुद्ध म्हणाले, ''जो धनुष्यबाण वापरतो, त्याला त्याचा वापर माहीत असतो, जो नाव हाकतो, जो घराचे बांधकाम करतो, त्याला ते काम माहीत असते. पण जो ज्ञानी आहे तो स्वत:वर नियंत्रण ठेवतो.

मुलाने विचारले, ते कसे काय? बुद्ध म्हणाले, 'जर कोणी प्रशंसा केली तर अभिमानाने ताठ होत नाही तसेच निंदा केली तरी तो शांत राहतो, अशी व्यक्ती नेहमी आनंदी असते. मुलाला जाणीव झाली की सर्वात मोठे कौशल्य तर स्वत:ला नियंत्रणात ठेवण्याचे असते.'

**तात्पर्य :- ज्याला स्वत:ला नियंत्रित ठेवता येते त्याला समभाव ठेवता येतो. हाच समभाव अनुकूल आणि प्रतिकूल परिस्थितीत आपल्याला आनंदी ठेवतो.**

जन्म हा अखेरचा

## परकायस्थल - २

त्याने जर निषिद्ध कर्म केले तर त्याचे फल असते पाप आणि त्याचा दुसरा भाग असतो अशुभवासना. फल आणि वासना असे कर्माचे दोन भाग असतात. फळ प्रत्येकाला भोगावे लागते. पुण्यकर्माचे फळ सुख असून पापकर्माचे फळ दु:ख आहे. ते जीवात्म्याला भोगावेच लागते. कर्माचे फळ आपण पुरुषार्थाने, प्रयत्नाने बदलू शकत नाही. परंतु आपली वासना मात्र आपण प्रयत्न करुन बदलू शकतो. अशुभवासनेचे शुभवासनेत परिवर्तन करता येते. एखाद्या शुभवासना असलेल्या मनुष्याभोवती जर अशुभवासना असलेल्या माणसांची गर्दी झाली तर हळूहळू त्याची शुभवासना अशुभवासनेत परिवर्तित होते. एखाद्या दुरात्म्याने जर सत्संग केला तर हळूहळू त्याची अशुभवासना बदलून ती शुभ होते. वाल्याचा देखील वाल्मिकी होतो. याप्रकारे वासना बदलण्यात आपला पुरुषार्थ सफल होतो. वासना कर्मामुळे बनते. म्हणून मनुष्याने असेच कर्म करावे की ज्याचे शुभ फळ मिळेल आणि शुभवासना बनेल. आपल्या हातून घडणारे कर्म पुढे आपले दैव बनणार असते. म्हणून आपणच आपल्याला घडवतो आणि आपणच आपल्याला बिघडवतो. आपण दुसऱ्यांमुळे बिघडलो या म्हणण्याला काही अर्थ नाही. प्रत्येक मनुष्य आपापल्या कर्मसूत्राने बांधलेला असतो. कर्मामुळे वासना बनते आणि वासनेप्रमाणे इंद्रिये कर्मात प्रवृत्त होतात.

**(क्रमश:)**

**– काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## नवरात्रीचे महात्म्य पाल्यांना सांगा...

'नवरात्री म्हणजे काय ?' असा प्रश्न आत्ताच्या शालेय विद्यार्थ्यांना विचारला तर त्यांच्याकडून नक्कीच उत्तर येईल? 'नवरात्री म्हणजे रात्री उशिरापर्यंत दांडिया खेळणे आणि नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे!' एवढ्यापुरतेच मर्यादित नाहीये.



खरेतर हिंदू धर्मातील प्रत्येक सणाचे एक वेगळे वैशिष्ट्य असून स्थानपरत्वे तो साजरा करण्याच्या पद्धतीही बदलतात. महाराष्ट्रात त्यातही मुंबई, ठाण्यात, गुजराती नागरिक मोठ्या संख्येने असल्याने तरुणांवर गरबा आणि दांडियाचा विशेष प्रभाव असल्याचे दिसते. त्यामुळे महाराष्ट्राच्या मातीत तो कसा साजरा करायला हवा याविषयी आजची पिढी अनभिज्ञ असल्याचे लक्षात येते. महाराष्ट्रात घटस्थापना ही प्रधान असते. त्याच्यासमवेत अखंड नंदादीप तेवत ठेवला जातो. काही ठिकाणी त्रिकाळपूजन केले जाते, सुवासिनी नवरात्रीच्या दिवसांत सप्तशती ग्रंथाच्या पाठांचे वाचन करतात, कुमारिकांचे पूजन करून त्यांना भोजन दिले जाते. नऊ दिवस एकभोजनी किंवा निराहार उपवास केला जातो. रात्री देवीचा जागर केला जातो.

ललिता पंचमी, महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे), अष्टमीचे होमहवन, सरस्वती आवाहन-पूजन अशा प्रकारचे धार्मिक विधी नवरात्रीच्या निमित्ताने केले जातात. काही ठिकाणी भोंडल्याचे आयोजन केले जाते. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या या प्रथा आता राज्यातील काही भागांपुरत्या मर्यादित राहिल्या आहेत. पुढे येणाऱ्या पिढीला नवरात्री हा देवीच्या उपासनेचा उत्सव आहे हेही कदाचित आपल्याला सांगावे लागेल. अशी वेळ येऊ नये म्हणून नवरात्री उत्सवाचे माहात्म्य आणि तो कसा साजरा करावा याविषयीचे ज्ञान लहानपणीच आपल्या पाल्यांना द्यावे लागेल.

**- मोक्षदा घाणेकर, मुंबई.**

# टेनिस विश्‍व रितं, अश्रूंची 'कमाई'

**तब्बल २० ग्रँडस्लॅम, २४ वर्षांची डौलदार कारकीर्द. ही कमाई टेनिससम्राट रॉजर फेडररची. पण, कारकीर्दीच्या अखेरच्या सामन्यात त्याने जे कमवलंय कदाचित ते फार कमी जणांना अनुभवायला मिळतं. लंडनच्या लेव्हर कपमध्ये नदालच्या साथीने तो मैदानात उतरला. पण, पराभूत झाला. मग जे घडलं तो इतिहास होता. कुठल्या पेनने नव्हे तर अश्रूंनी लिहिलेला. जे फेडररचं सर्वस्व होतं, विश्व होतं, त्या टेनिस विश्वातली अखेरची मॅच खेळून तो थांबला होता. ग्रँड स्लॅममध्ये त्याची रॅकेट आता म्यान झाली होती. तरीही त्याच्या रॅकेटची तलवारीसारखी धारदार कामगिरी, त्यातही कलात्मक मखमली जादूचे फटके तुमच्या आमच्यासह सर्वांनीच अनुभवलेत. जसा सचिनचा स्ट्रेट ड्राईव्ह गोळीसारखा जायचा. तसाच फेडररचा फोरहँड किंवा क्रॉसकोर्ट फटका. सिंगल हँडेड बॅकहँड खेळणारे टेनिसपटू प्रचंड देखणे वाटतात पाहायला. फेडरर त्यातला एक होता.**

टेनिस कोर्ट हा श्वास असल्यासारखा फेडरर २४ वर्ष ते जगला, अगदी भरभरून. अशा किंग फेडररच्या निवृत्तीच्या क्षणी फेडरर स्वत: भावूक होऊन रडणं अगदी स्वाभाविक होतं. त्याच वेळी नदालच्या डोळ्यातले अश्रूही त्याच्या टेनिस कोर्टवरील रॅलीइतकेच वेगाने वाहिलेले जगाने पाहिले. एकीकडे फेडररला दाटून आलं होतं. इतकं सगळं कमवून रितं झाल्याची भावना त्याच्या मनी असतानाच सर्वात कडवा प्रतिस्पर्धी असलेला नदालच्या डोळ्यातूनही अश्रूंचा झरा वाहत होता. २० ग्रँड स्लॅम जिंकणं, १०३ एटीपी टायटल्स, १२५१ एटीपी मॅचेस जिंकणं, २०० हून अधिक आठवडे नंबर वन राहणं एकीकडे आणि त्याच वेळी आपण खेळणं थांबवतोय म्हणून प्रतिस्पर्धी चॅम्पियन खेळाडूच्या डोळ्यातून आपल्यासाठी अश्रू येणं हे एकीकडे. इथे अश्रूंचंच पारडं काकणभर सरसच ठरलं असावं.

एरवी चिवटपणे हार न मानणारे दोघंही घामाच्या धारांनी चिंब व्हायचे. आज त्याची जागा अश्रूंच्या धारांनी घेतली होती. त्या घामाला कष्टाचा, मेहनतीचा गंध होता. तर या अश्रूंना एकमेकांबद्दल असलेल्या आदराचा, आपलेपणाचा दरवळ होता. इतकी वर्षे एकमेकांविरोधात खेळून या दोघांनाही परस्परांच्या खेळाविषयी, व्यक्तिमत्त्वाविषयी प्रचंड आदर होता.



प्रेम होतं. तेच अश्रूरुपाने डोळ्यातून बाहेर येत होतं. अश्रूंचा पाऊस दोघांना जसा भिजवून गेला, तसाच त्यांच्या चाहत्यांनाही. त्या अश्रूंमध्ये दोघांच्यात झालेल्या ४० एटीपी फायनल्समधील फटक्यांच्या आठवणी ओघळत होत्या, तशाच १४ ग्रँड स्लॅम अंतिम फेऱ्यांमधील सामन्यांच्याही. आसवांचा एकेक थेंब एखाद्या रत्नाइतका मूल्यवान होता. 'विराट कोहलीने दोघंही बाजूला बसून रडतानाचा फोटो ट्विट केला आणि बेस्ट स्पोर्टस् पिक्चर एव्हर', अशी समर्पक कॅप्शन दिली. मला सचिनच्या वानखेडेवरील अखेरच्या सामन्याची आठवण झाली. तेव्हाही पॅव्हेलियनमध्ये परतताना सचिनचे डोळे पाणावलेले अन् त्याच्या चाहत्यांचेही.

खेळ, हार-जीत या पलिकडे जेंव्हा एखादा खेळाडू पोहोचतो, तेंव्हा तो मनाला अधिक भिडतो, भावतो. फेडररबाबत आपलं असंच झालंय. खेळातली सहजता, बर्फालाही लाजवेल असं टेम्परामेंट, मॅच पॉईंटवरुनही समोरच्या खेळाडूच्या जबड्यातून मॅच खेचून काढण्याचं कसब, कमालीचा अत्युच्च फिटनेस. या साऱ्याचा संगम म्हणजे फेडरर.

फेडररला अलविदा करताना टेनिसची एक संस्मरणीय मैफलीची भैरवी पाहिल्याचा अनुभव साऱ्यांनीच घेतला. डोळे आणि मन तृप्त झालं. नदाल अजूनही खेळतोय, जोकोविचही आहे. त्याच वेळी किंग फेडरर मात्र पुढच्या मॅचेस कोर्टबाहेरून एन्जॉय करणार आहे. टेनिसरसिकांना भरभरून आनंद देणारा फेडरर आता निवृत्तीनंतरचं आयुष्य आपल्या कुटुंबासमवेत भरभरून आनंदात जगेल. त्याच वेळी त्याच्या चाहत्यांना त्याचं कोर्टवर नसणं रुखरुख लावून जाईल. डोळ्याच्या कडाही नकळत पाणावतील.

**- अश्‍विन बापट.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.




## विद्यारंभ प्री स्कूलच्या फॅन्सी ड्रेस स्पर्धेत प्रगती बनसोडे प्रथम

✔ **सुराज्य/सोलापूर** : येथील विद्यारंभ प्री. स्कूल मध्ये घेण्यात आलेल्या फॅन्सी ड्रेस स्पर्धेमध्ये प्रगती बनसोडे हिने प्रथम क्रमांक पटकाविला. गुणवत्तापूर्ण शिक्षणात नावलौकिक असलेल्या विद्यारंभ प्री स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची फॅन्सी ड्रेस स्पर्धा उत्साही वातावरणात पार पडली. या स्पर्धेत विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, श्रीकृष्ण, डॉक्टर, पोलीस इन्स्पेक्टर, नेव्ही ऑफिसर, परी यासह विविध वेशभूषा परिधान करून विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्व व कलागुणांचा आविष्कार घडविला. या स्पर्धेत सावित्रीमाई फुले यांची वेशभूषा केलेल्या प्रगती बनसोडे हिने प्रेरक विचार मांडले. प्रगती बनसोडे हिने या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. मान्यवर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी विद्यार्थी, शिक्षिका व पालक मोठया संख्येने उपस्थित होते. विद्यारंभ प्री स्कूलमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा व उपक्रम घेण्यात येतात.

## माळशिरस पोलिसात दोघांविरुध्द सावकारी अधिनियमाचा गुन्हा

✔ **सुराज्य/सोलापूर** : व्याजासहित सर्व रक्कम घेऊन शेतकऱ्याची जमीन बळकवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोघांविरुध्द सावकारी ॲक्टचा गुन्हा माळशिरस पोलिसात दाखल झाला आहे. ही घटना शिंगोणी (ता. माळशिरस) येथे घडली. यासंदर्भात कालिदास नामदेव काळेल (वय ५६ रा. शिंगोणी) या शेतकऱ्याने पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी सुरेश दिनकर गोडसे (रा. शिंगोणी) आणि नवनाथ विलास काळेल (रा. माण जि. सातारा) या दोघा विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. कालिदास काळेल यांनी सुरेश आणि नवनाथ यांच्याकडून २०१६ साली ३ टक्के व्याजाने पैसे घेऊन शेती गहाण ठेवली होती. त्यानंतर त्यांनी व्याजासहित ८ लाख रुपयांची परतफेड फेब्रुवारी २०२२ या दरम्यान केली. आणि गहाण ठेवलेली शेती आपल्या नावावर करावे म्हणून त्यांना सांगितले होते. तेंव्हा दोघांनी आणखीन दीड लाख रुपये दे नाहीतर जमीन देणार नाही. म्हणून त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. दरम्यान काळेल यांनी अकलूज येथील सहाय्यक निबंधकाकडे तक्रार दिली होती. त्या अर्जाची चौकशी केल्यानंतर त्यांनी दोघांविरुध्द तक्रार देण्यास त्यांना सांगितले. अशी नोंद माळशिरस पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार कणसे करीत आहेत.



## श्री स्वामी समर्थांचा अक्कलकोट येथील आगमन दिनानिमित्त नामस्मरण

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : ललिता पंचमी श्री स्वामी समर्थांचा अक्कलकोट येथील आगमन दिवस या दिवशी खंडोबा मंदिरात प्रथम स्वामिनी दर्शन दिले. तो अक्कलकोटकराचा व स्वामी भक्तांचा भाग्याचा दिवस, महाराजांनी भ्रमण करून अक्कलकोट हे मुळस्थान म्हणून निवडले. याकरिता त्यांच्या स्वागतानिमित्त तो दिवस समर्थ नगरी परिवाराच्या वतीने (शुक्रवार ३० सप्टेंबर रोजी ) अक्कलकोटसह महाराष्ट्रात एकाच दिवशी एकाच वेळेस एकत्रित नामस्मरणामध्ये साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवात सर्वांनी सहभागी होऊन स्वामी चरणी आपली सेवा रुजू करून स्वामींचे स्वागत करावे. असे आवाहन डॉ. मनोहर मोरे यांनी केले. ललिता पंचमी निमित्त अक्कलकोट येथील श्री उपलप विठ्ठल मंदिर एवन चौक येथे एकत्रित नामस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे समर्थ नगरी प्रतिष्ठानचे मार्गदर्शक डॉ मनोहर मोरे यांनी अक्कलकोटकराना पत्रकाद्वारे आवाहन केले. श्री महेश इंगळे ( वटवृक्षस्वामी महाराज देवस्थान चेअरमन ) व वे. शा. सं. अण्णू महाराज ( श्री स्वामिभक्त चोळप्पा महाराज वंशज ) यांच्या मार्गदर्शनाखाली समर्थनगरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सैदप्पा इंगळे यांच्या नियोजनानुसार मिरज, तासगाव, पुणे, कोल्हापूर, चिक्कोडी, रत्नागिरी, भुईगाव, बोरीवली, ठाणे, भांडुप, नाशिक, लातूर, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, चंद्रपूर आदिसह वेगवेगळ्या ठिकाणी स्वामीनामाचे प्रसार करत ललिता पंचमी या दिवसाचे महत्त्व पाठवून देण्यात आले.



## उपळेदुमाला येथे बनावट दारूसह ५ लाखांचा माल जप्त

✔ **सुराज्य/सोलापूर** : राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने एका मोटारींचा पाठलाग करून त्यातील १ लाख १२ हजाराची बनावट दारू आणि मोटार असा ५ लाख १२ हजाराचा माल जप्त केला. ही कारवाई काल रविवारी रात्रीच्या सुमारास उपळेदुमाला (ता. बार्शी) येथे करण्यात आली. मात्र दोघे आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाले. बार्शी ते तुळजापूर रोडवरील उपळे दुमाला येथे एमएच१२-एनयु-२७५२ या सिफ्ट मोटारीतून बनावट दारूची वाहतूक केली जात असल्याची माहिती निरीक्षक सदानंद मस्करे यांना मिळाली. त्याप्रमाणे त्यांच्या पथकाने काल रात्री त्या मोटारींचा पाठलाग केला. आणि मोटारीतील ३२ पेट्या बनावट दारू आणि वाहन जप्त केले. याप्रकरणी पळून गेलेल्या दोघा अनोळखी इसमाविरुध्द दारूबंदी अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# अकलूजमधील 'सिंहां'च्या बारामतीच्या गडाला धुसण्या

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी



- 'टप्प्यात आले की करेक्ट कार्यक्रम' करण्याचा मोहिते-पाटलांचा इरादा पक्का
- भाजपची ताकद घेऊन बारामतीकरांच्या मजबूत गडाला धक्के देण्यासाठी फौज सज्ज
- भाजपच्या 'मिशन बारामती' व्हिजनमध्ये अकलूजचे सिंह
- बारामतीकर काकांची चाणक्य नीती उलटून टाकणार त्यांच्याच प्रांतात

'टप्प्यात आले की करेक्ट कार्यक्रम करायचा', ही खुद्द बारामतीकर काका - पुतण्याची राजकारणातील चाणक्य नीती. याच चाणक्य नीतीचा भाजपवाले त्यातही पर्यायाने अकलूजचे सिंह खुद्द बारामतीच्या प्रांतात करणार आहेत. भाजपच्यावतीने बारामतीच्या मुलुखात 'कमळ' फुलवण्यासाठी 'मिशन बारामती' हे व्हिजन राबवण्यात येणार आहे. याच व्हिजन अंतर्गत भाजपची ताकद घेऊन बारामतीच्या मजबूत गडाला धक्के देण्यासाठी अकलूजच्या सिंहांची फौज सज्ज झालीय. यातून एका दगडात दोन पक्षी मारण्याचा अकलूजच्या सिंहांचा डाव आहे. शरद पवारांसारख्या राष्ट्रीय नेत्याच्या मुलुखात 'कमळ' फुलविताना ज्या पक्षात आपण आहोत, त्या पक्षाला मदत करायची, अन् दुसरीकडे ज्या बारामतीकर काका - पुतण्याने मध्यंतरीच्या काळात आपणास किंमत मोजायला लावली, त्याच बारामतीकरांच्या मुलखात 'कमळ' फुलवण्याच्या आडून पवार परिवाराच्या पॉवरबाज गडाला धक्के देत, टप्प्यात आले म्हणून करेक्ट कार्यक्रम करायचे हेच सिंहांचे राजकारण अन् त्यांनी बारामतीकरांसाठी टाकलेल्या राजकारणाच्या सोंगट्या.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण ह्या बारामतीत आल्या होत्या. नेमक्या याच वेळी मोहिते-पाटील परिवाराचे प्रमुख आणि ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील तसेच धैर्यशील मोहिते-पाटील हे अकलूजचे सिंह या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते. या सिंहांनी येथे खास करून उपस्थिती दाखवून बारामतीकर पवार काका - पुतण्याला जे काही दाखवून द्यायचे, ते दिले. जो काही मॅसेज जायला हवा होता, तो पवारांच्या परिवारात तडकावलादेखील.

तसेच दिल्लीकर भाजपवाले खूष होतील हे देखील अकलूजकरांनी उपस्थिती दाखवून दिले. महाराष्ट्राच्या राजकारणातदेखील आम्ही 'वजनदार' आहोत, खुद्द पवारांच्या बारामती प्रांतात जाऊन आम्हीच त्यांच्या विरोधात डरकाळ्या फोडू शकतो, हे देखील दिल्लीसह राज्याच्या नेतृत्वाला मोहिते-पाटील यांनी दाखवून दिले. येत्या काळात भाजपच्यावतीने बारामतीच्या प्रांतात मिशन भाजप हे व्हिजन राबवले जाणार आहे, त्यात देखील मुद्दामहून अकलूजच्या सिंहांचा सहभाग असणार आहे. अकलूजच्या सिंहांना डिवचण्याबरोबरच त्यांच्या नेतृत्वाच्या पाडावासाठी जे काही करता येईल, तितके सगळे सगळे बारामतीकर काका - पुतण्याने केले. याची 'सल' आजही सिंहांना चांगलीच बोचते आहे. अकलूजचे सिंह ही सल तशी आयुष्यात पर्यायाने जोपर्यंत राजकारणात आहेत, तोपर्यंत ते विसरू शकणार नाहीत.

वास्तविक राष्ट्रवादीचा पर्यायाने पॉवरबाज पवारांचा बारामती हा गड अत्यंत भक्कम आहे, या गडाला अकलूजच्या सिंहांनी भाजपची ताकद पाठीशी घेऊन धुसण्या द्यायला सुरुवात केली आहे. या धुसण्यांची तीव्रता भविष्यात मोठी असेल. या धुसण्यांनी पवारांचा मजबूत गड किती हालेल, परिणाम काय होईल, हे येणाऱ्या काळाला माहीत असेल पण बारामतीच्या भक्कम गडाला धुसण्या देण्याची दाखवलेली तयारी आणि त्यादृष्टीने टाकलेली पावले इथेच अकलूजच्या सिंहांचे धाडस आणि विजय आहे, असे मानले जातेय.

### वार परिवारात उठली चुरचुर

बारामती हे आमचे साम्राज्य. इथे मर्जी चालेल, ती फक्त आमचीच. इथले राजे फक्त आम्हीच. इथले परमनंट लोकप्रतिनिधी आम्हीच. असे मानणाऱ्या शरद पवार आणि अजित पवारांच्या साम्राज्यात भाजपने चाल करणे हेच अत्यंत भयावह आणि तितकेच विशेषदेखील. मुळात बारामतीच्या प्रांतात भाजपचे 'कमळ' फुलण्यासाठी व्हिजन राबवणार हेच पवार काका - पुतण्यासाठी अस्वस्थ करणार. चुळबुळ वाढवणार. पुन्हा त्यात अकलूजच्या मोहिते - पाटलांनी यात हिरहिरने भाग घेणे हे तर बारामतीकर काका - पुतण्याला अधिकच अस्वस्थ तसेच विचलित करणार. यातून बारामतीकर पवार परिवारात चुरचुर उठलीय. भाजप पर्यायाने अकलूजच्या सिंहाचे राजकीय अतिक्रमण परतवून लावण्यासाठी गड 'जैसे थे' अबाधित ठेवण्यासाठी पवार परिवार देखील सजग होणे क्रमप्राप्त आहे.

## जुनी पेन्शन योजनेसाठी बेमुदत संपाच्या तयारीला लागा : खांडेकर

✔ सुराज्य/सोलापूर



नुकताच जुनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीसाठी संपूर्ण राज्यभर आंदोलन करण्यात आले आहे. हे आंदोलन आता तीव्र करावे लगणार आहे. जुनी पेन्शन योजना मागणीसाठी बेमुदत संपच्या तयारीला लागा असे आवाहन महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्री वितेश खांडेकर यांनी सोलापुरातील सर्व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना केले

महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे प्रदेशाध्यक्ष वितेश खांडेकर हे काल एका संस्थेच्या कार्यक्रमासाठी त्याचे सोलापूर दौऱ्यावर आले होते. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेऊन आंदोलनाचा आढावा घेतला आणि मार्गदर्शन केले.

शासकीय निमशासकीय कर्मचारी संघटना समन्वय समितीचे निमंत्रक अशोक इंदापुरे यांनी प्रास्ताविकात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना व शासकीय निम शासकीय कर्मचारी संघटना समन्वय समितीच्या वतीने सामूहिक नेतृत्वाखाली एकत्रित मोर्चा काढला होता. या मोर्चात राज्य सरकारी कर्मचारी जिल्हा परिषद कर्मचारी महानगरपालिका कर्मचारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यापीठ व महाविद्यालय कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते असे सांगितले.

वितेश खांडेकर मार्गदर्शन करताना म्हणाले अनेक संघटना अनेक नेते त्यामुळे निर्णय घेण्यात खूप अडचणी येतात परंतु जुनी पेन्शन योजना ही सर्वांसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने आपल्यातले हेवेदावे नेतृत्वातील श्रेयवाद बाजूला सारून कर्मचाऱ्यांच्या हितासाठी एकत्रित या. सोलापूर प्रमाणे राज्यपातळीवर देखील अशीच एकजूट करण्यासाठी आपापल्या संघटनेचे राज्याच्या पदाधिकाऱ्यांकडे आग्रह धरावा. या बैठकीस अध्यक्ष राज्य सरकारी चतुर्थी कर्मचारी संघटना शंतनु गायकवाड, अध्यक्ष सिव्हिल हॉस्पिटल शंकर जाधव, राम शिंदे अध्यक्ष जुनी पेन्शन संघटना, मारप्पा फंदीलोलू अध्यक्ष सिंचन व्यवस्थापन कर्मचारी संघटना, प्रसाद सोनवणे अध्यक्ष महसूल कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, राजाभाऊ सोनकांबळे सहसचिव राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, देविदास शिंदे अध्यक्ष सोलापूर शहर चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना, चंद्रकांत चलवादी कार्याध्यक्ष सार्वजनिक बांधकाम पाटबंधारे कर्मचारी संघटना, विठ्ठल कोकाटे, शेख रवींद्र नष्टे रत्नाकर बनसोडे दिलीप वडवेराव उपस्थित होते. राम शिंदे यांनी आभार मानले.

## नातेपुते येथे ८० हजारांचे दागिने लंपास

✔ **सुराज्य/नातेपुते** : दवाखान्यात दाखल असलेल्या मुलाला पाहण्यास गेले असता चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून रोख रकमेसह ८० हजाराचे दागिने पळविले. ही चोरी नातेपुते (ता. माळशिरस) येथे रविवारी पहाटेच्या सुमारास घडली.

प्रकाश रामचंद्र पारसे (वय ३१ रा. नातेपुते) यांचा मुलगाआजारी असल्याने त्याला दवाखान्यात दाखल केले होते. शनिवारी रात्रीच्या सुमारास घराला कुलूप लावून ते



दवाखान्यात गेले होते. ही संधी साधून चोरट्यांनी पहाटेचा सुमारास त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून कपाटातील ७ हजार रुपये रोख आणि सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ८० हजाराचा ऐवज चोरून पोबारा केला. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पारसे यांनी या घरफोडीची फिर्याद नातेपुते पोलिसात दाखल केली. महिला फौजदार बैनवाड या पूढील तपास करीत आहेत.

## तुम्हाला माझे नेते चालत नसतील तर तुम्ही गेला उडत : पाटील

✔ **सुराज्य/मोहोळ** : भाजपमध्ये जायच म्हणून पोस्टर वरून घड्याळ काढून टाकले पवार साहेब अजित दादा यांचे फोटो काढून टाकले. आणि भाजपत जायचे असे ते तोंडाने सांगत नाहीत तर प्रत्यक्ष अशा कृती करून दाखवतात जर तुम्हाला माझे नेते चालत नसतील तर तुम्ही गेला उडत अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रवक्ते उमेश पाटील यांनी अनगर च्या मालकांवर घणाघाती टीका केली.

ते मोहोळ येथील चाटी गल्ली येथे मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी स्वखर्चातून उभारलेला शुध्द पिण्याच्या पाण्याचा प्लँट फ्लेवर ब्लॉक व इतर कामाचे उद्घाटन प्रसंगी उमेश पाटील हे बोलत होते. याप्रसंगी मोहोळ पंचायत समितीचे माजी उपसभापती मानाजी माने, राहुल क्षीरसागर, रमेश बारसकर, समाधान पाटील, अण्णासाहेब पाटील बापू गोटे, राजू रसाळ, शांतीकुमार अष्टूळ आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतुल क्षीरसागर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार शीलवंत क्षीरसागर यांनी मानले या कार्यक्रमाला बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.



## रायगडावर शिवरायांचा राज्याभिषेक दिन

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला इतिहासात फार महत्त्व आहे. संभाजी ब्रिगेडच्या वतीने २४ सप्टेंबर २०२२ रोजी किल्ले रायगडावर महाराजांचा ३४९ वा द्वितीय शिवराज्याभिषेक सोहळा मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

६ जून १६७४ रोजी किल्ले रायगडावर महाराजांचा पहिला राज्याभिषेक संपन्न झाला होता, त्यानंतर काही काळातच २४ सप्टेंबर १६७४ रोजी महाराजांनी आपला दुसरा राज्याभिषेक करवून घेतला. पहिल्या होता राज्याभिषेक सोहळ्या इतकेच दुसऱ्या राज्याभिषेक सोहळ्यालाही महत्त्व आहे. या सोहळ्याचे आयोजन संभाजी ब्रिगेड चे कोकण विभागीय अध्यक्ष सचिन सावंत देसाई यांच्या वतीने करण्यात आले होते. तसेच या सोहळयास प्रमुख उपस्थिती म्हणून संभाजी ब्रिगेड प्रदेश उपाध्यक्ष सुधांशू मोहोड, संघटक प्रदीप कणसे, अजय भोसले, तसेच शेतकरी आघाडीचे संतोष गव्हाणे, रायगड दक्षिण जिल्हाध्यक्ष वैभव सुर्वे, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष सुभाष सावंत, पुणे शहराध्यक्ष हर्षवर्धन मगदूम उपस्थित होते.

## अकलूज येथे चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण

✔ **सुराज्य/अकलूज** : श्री विजय गणेशोत्सव मंडळ शंकर नगर अकलूज यांच्यावतीने स्व. उदयसिंह मोहिते पाटील यांच्या जयंती निमित्ताने आयोजित केलेल्या शालेय व खुल्या गटातील चित्रकला स्पर्धाचा बक्षीस वितरण समारंभ झाला.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इंजिनिअरिंग कॉलेज या ठिकाणी आयोजित केलेल्या बक्षीस वितरण समारंभास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, डीवायएसपी बसवराज शिवपुजे, सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, रावसाहेब भिलवडे, ॲड. नितीनराव खराडे पाटील, कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, सेक्रेटरी अभयसिंह माने देशमुख, श्रीकांत राऊत, लक्ष्मण आसबे आदी मान्यवर उपस्थित होते. खुल्या गटातील स्पर्धेचे उद्घाटन माजी सरपंच शिवतेसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते झाले.

स्व. उदयसिंह मोहिते पाटील यांच्या जयंती निमित्ताने आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत माळशिरस तालुक्यातील १३ केंद्रातून सुमारे सात हजार स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत केंद्र पातळी व तालुका पातळी साठी स्वतंत्र बक्षिसे देण्यात आली. तालुका पातळीवरील बक्षिसे गट १ली, २री प्रथम- वेदांत गायकवाड (समावी अकलूज) द्वितीय- वैभवी शिंदे (जि प शाळा यशवंतनगर) तृतीय- प्राजक्ता लांडगे (श्री र मो पा वि नातेपुते) गट ३री ४ थी प्रथम- जयवर्धन टिंगरे (समावी परा. अकलूज) द्वितीय- अनन्या भोसले (द ग्रीन फिंगर स्कूल शंकरनगर) .

# माळशिरस जि.प. कर्मचारी संस्थेचे कार्य कौतुकास्पद : मदनसिंह

✔ सुराज्य/माळशिरस



माळशिरस तालुका जि प कर्मचारी संस्थेची २५ वी रौप्य महोत्सवी वार्षिक सर्वसाधारण सभा पंचायत समिती कार्यालय येथील राष्ट्र संत गाडगे महाराज सभागृहात चेअरमन रवींद्र पवार यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. सभेस महाराष्ट्र राज्याचे माजी उप मुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते -पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विनायक गुळवे, सहायक गटविकास अधिकारी किरण मोरे, माजी सभापती रावसाहेब पराडे, सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटीलसह परिषदेचे प्रदेश अध्यक्ष प्रकाश कराळे, संस्थेचे संस्थापक उत्तमराव माने, गणपतराव वाघमोडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सुरुवातीस राष्ट्रमाता जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज, सह महर्षी शंकरराव मोहिते पाटील, राजमाता अक्कासाहेब यांचे प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करून दीप प्रज्वलन करण्यात आले.

सभेचे प्रास्ताविक मार्गदर्शक व संस्थापक उत्तमराव माने यांनी केले त्यात संस्था स्थापनेपासून आढावा सादर केला तसेच संस्थेने आजपर्यंत केलेल्या सामाजिक, शैक्षणिक उपक्रमाची माहिती दिली. संस्था विजयसिंह मोहिते पाटील, मदनसिंह मोहिते पाटील, आ रणजितसिंह मोहिते पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गेली २५ वर्ष कार्यरत असून या ही वर्षी संस्थेने ७. २५% लाभांश सभासदांना दिला असल्याची सांगितले प्रमुख पाहुण्यांचा संस्थेच्या वतीने चेअरमन रवींद्र पवार व्हाईस चेअरमन डॉक्टर विकास तांबडे संचालक कृष्णात बाबर सावळस्कर भाऊसाहेब आरडी राऊत तसेच श्रीमती भापकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त माजी संचालक सिध्देश्वर नागटिळक, अजित देशपांडे, लक्ष्मण नारायणकर, बाळासाहेब संपत्ती गोरे कौशल्या बाळासाहेब पाटील अरुण मारुती ठोकळे व सभासदांच्या पाल्यांनी मार्च २०२२ मध्ये इयत्ता दहावी व बारावी ८५ टक्के पेक्षा गुण प्राप्त केल्याबद्दल संस्थेच्या वतीने पाल्यांचा भेटवस्तू देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यात अक्षदा काळे, वरद शिंदे, विजया निंबाळकर, आर्या आंबले, श्रीपाद सांगडे, माहेश्वरी भापकर, अथर्व आंबले, श्रेया राजमाने यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर वसुली कमी सहकार्य केल्याबद्दल सर्व विभागातील कनिष्ठ सहाय्यकांचा संस्थेच्या वतीने भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचाही सन्मान करण्यात आला जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या सायकल बँक उपक्रमाला संस्थेच्या वतीने सहा सायकल मान्यवरांच्या हस्ते गटशिक्षणाधिकारी देशमुख यांना सुपूर्त करण्यात आल्या. सोहळ्यानंतर सभेचे कामकाजास सुरुवात झाली. संस्थेचे सचिव राजेंद्र मिसाळ यांनी विषयपत्रिकेवरील सर्व विषय वाचून दाखवले असता उपस्थित सभागृहाने सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी दिली.

# श्री पांडुरंग कारखान्याचा ऊस दर जिल्ह्यात सर्वाधिक

■ संपूर्ण एफआरपीची रक्कम प्रति मे. टन रु. २,६२६ प्रमाणे अदा

■ उशिरा गाळप झालेल्या उसास प्रति मे. टन रु. २,७२६ प्रमाणे अदा





✔ सुराज्य/श्रीपूर

श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने गळीत हंगाम २०२१-२२ मध्ये गाळप केलेल्या ऊसास एफ. आ. पी. पैकी देय असणारी ऊस दराची प्रति मे. टन रक्कम रु. २०० शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली आहे. हा ऊस दर जिल्ह्यात सर्वाधिक असल्याने जिल्ह्यात ऊस दरामध्ये पहिल्या क्रमांकावर राहण्याची परंपरा कायम ठेवली आहे. तसेच १ एप्रिल २०२२ नंतर ऊस तोड झालेल्या शेतकऱ्यांना जास्तीची प्रति मे. टन रु. १०० प्रमाणे एकुण रु. २७२६ अदा केले असलेची माहिती कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली.

यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलास खुळे, कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी उपस्थित होते. कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी माहिती दिली की, श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने गळीत हंगाम २०२१-२२ मध्ये १२ लाख, ५१हजार, ३४४ मे. टन ऊसाचे गाळप करुन १४लाख, २५ हजार, २८० क्विं. साखर उत्पादित केली आहे. त्याचबरोबर साखर उताराही ११. ६५ % इतका राहिला आहे. को-जनरेशन मधुन ८ कोटी ५३ लाख युनिट विज निर्माण करुन ४ कोटी ०५ लाख युनिट विज निर्यात केली आहे. कारखान्याच्या आसवानी प्रकल्पापासून १. २८ कोटी लिटर इथेनॉलचे उत्पादन घेतले आहे. कारखान्याचे चेअरमन मा. आ. प्रशांतराव परिचारक हे श्रध्देय सुधाकरपंत परिचारक यांच्या शेतकरी हिताय, कामगार सुखाय या उक्तीप्रमाणेच प्रथम शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन त्यांनी एफ आर पी प्रमाणे निघणारी ऊस दराची रक्कम शेतकऱ्यांना शेती खर्चासाठी तसेच दसरा, दिवाळी सणासाठी अदा करुन आर्थिक हातभार लावण्याचा प्रयत्न केला आहे. हंगाम २०२१-२२ मध्ये गाळप केलेल्या ऊसाची एफ आर पी प्रति मे. टन रक्कम रु. २६२६/- असुन त्यापैकी पूर्वीच रक्कम रुपये २४२६ शेतकऱ्यांना अदा केलेली आहे, उर्वरीत प्रति मे. टन रक्कम रुपये २००/- प्रमाणे ऊस बिलाची देय रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केली आहे तसेच गाळप हंगाम २०२१-२२ मध्ये १ एप्रिल २०२२ नंतर ऊस तोड केलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति मे. टन रु. १००/- प्रमाणे ज्यादाची रक्कम दिल्याने त्यांना कारखान्याकडून प्रति मे. टन २७२६/- प्रमाणे ऊस दर दिला आहे. कारखान्याकडुन दिला जाणारा जिल्ह्यातील सर्वोच्च ऊस दर व देण्यात येणारी संपूर्ण ऊस बिले याचाच परिपाक म्हणून कारखान्याचे चेअरमन आ. प्रशांतराव परिचारक यांना नुकताच डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशनच्या पुरस्काराने सन्मानितही करण्यात आले आहे.

यावेळी कारखान्याचे संचालक दिनकराव मोरे, वसंतराव देशमुख, उमेशराव परिचारक, दिलीपराव चव्हाण, हरीष गायकवाड, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासो यलमर, भगवानराव चौगुले, भैरु वाघमारे, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, गंगा मामा विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हणमंत कदम, किसन सरवदे, शामराव साळुंखे, राणू पाटील इत्यादी उपस्थित होते.



## शिवबाबांच्या हस्ते खेळाडूंचा सन्मान

✔ सुराज्य/अकलूज : अकलूज ग्रामपंचायत चे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते ६४ व्या नॅशनल नेमबाजी स्पर्धेत ब्रॉंझ पदक मिळविल्याबद्दल माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील वैष्णवी अनिल खटावकर, तसेच खेलो इंडियामध्ये नेमबाजी मध्ये निवड झालेबद्दल आर्यमान अनिल खटावकर, या दोन्ही बहीण-भाऊ खेळाडूंचा सन्मान विजय चौक, अकलूज येथे संपन्न झाला. यावेळी मोहिते पाटील यांनी या खेळाडूंना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## स्वेरीच्या दोन विद्यार्थिनींची 'एटॉस' कंपनीत निवड

✔ सुराज्य/पंढरपूर : 'एटॉस' या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील पल्लवी रितूंड व चैताली ढवळे दोन विद्यार्थीनींची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे. ' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली. पुणे येथील एटॉस' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून पल्लवी रघुनाथ रितूंड व चैताली चांगदेव ढवळे या दोन विद्यार्थीनींची निवड केली. या विद्यार्थीनींना प्रत्येकी वार्षिक रु. ३. ४ लाखांचे पॅकेज मिळाले आहे. विद्यार्थिनींना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट व संबंधित विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष नामदेव कागदे, उपाध्यक्ष अशोक भोसले तसेच संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पालकांनी एटॉस' कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या पल्लवी रितूंड व चैताली ढवळे या दोन विद्यार्थीनींचे अभिनंदन केले.

## स्त्री शक्ती सोशल फाउंडेशनतर्फे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

✔ सुराज्य/अक्कलकोट : स्त्री शक्ती सोशल फाउंडेशन च्या वतीने कन्या दिनानिमित्त महिलांसाठी प्रथमोपचार या विषयावर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते अपघाता वेळी किंवा घरामध्ये स्वयंपाक करत असताना काही अपघात झाला तर त्याच्या उपचारासाठी वेळ न घालता घरी प्रथमोपचार कसा करावा याची माहिती स्नेहा भोवर यांनी आपल्या मार्गदर्शन शिबिरात सर्व महिलांना मार्गदर्शन केले यावेळी प्रभागातील असंख्य महिलांनी आपला सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमाच्या आयोजिका स्त्री शक्ती सोशल फाउंडेशनच्या संस्थापिका किरण माशाळकर, अर्चना माशाळकर, शकुंतला माशाळकर, अनुराधा कंदी, वर्षा वैद्य, लिंगव्वा सोलापुरे आदी महिला उपस्थित होत्या.

## रिक्षाचालकाने दीड लाखाचे सोन्याचे कडे दिले परत

✔ सुराज्य/सोलापूर : शहरातील प्रख्यात आहार तज्ञ सचिन मुळे व डॉक्टर तृप्ती मुळे यांचे दत्त चौकात क्लिनिक आहे. नेहमीप्रमाणे डॉक्टर तृप्ती मुळे या सकाळी अकरा वाजता सुमारास कार मधून क्लिनिक जवळ आल्या.फोनवर बोलत दवाखान्यात निघून गेल्या.पण सोन्याचे कडे हे सोबत होते.उतरत असताना ते कारजवळ रस्त्यावर पडलेले त्यांचे लक्षात आले नाही.दवाखान्यात रुग्ण मोठ्या प्रमाणात आले असल्यामुळे त्या वेगाने दवाखान्यात पोहोचल्या.सोबत सोन्याचे कडे होते हे ते त्या विसरून गेल्या. परंतु ही बाब समोर असलेल्या विजय क्लिनिक रिक्षा स्टॉप मधील रिक्षाचालक बबलू बेरे (रिक्षा क्रमांक एम.एच.१३ ए.एफ. ३५८१) याच्या लक्षात आली.त्यांनी ते कडे उचलून तात्काळ डॉ.सचिन मुळे यांच्याकडे सुपूर्त केले.याविषयी बोलताना डॉ.तृप्तीमुळे यांनी अशी प्रामाणिक माणसे फार दुर्मिळ आढळतात.माझ्या दृष्टीने हा अतिशय अनमोल असे दागिना होता.दागिन्यापेक्षा त्या युवकांनी तो परत आणून दिला ही त्याहून ही महत्त्वाची गोष्ट आहे.

## तिकीट तपासणीत एका दिवसात १० लाख रूपयांचा दंड वसूल

✔ सुराज्य/सोलापूर : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने मेगा तिकीट तपासणी मोहिम राबविली. ज्यामध्ये एका दिवसात विना तिकीट व अनियमित प्रवास करणाऱ्या प्रवशांकडून १० लाख रुपये वसुल करण्यात आला. विभागीय रेल्वे व्यवस्थापक शैलेश गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक एल. के. रणयेवले यांच्या देखरेखीखाली मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सोमवारी, २५ सप्टेंबर २०२२ रोजी मेगा तिकीट तपासणी मोहिम राबविली. यामध्ये सोलापूर, कलबुर्गी, दौंड आणि अहमदनगर मार्गावरील रेल्वेमध्ये तपासणी मोहिम राबविली. या मोहिमेमध्ये विना तिकीट, अनियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून आणि प्रवाशांनी वाहून नेलेल्या विनाबुकिंग सामानासाठी १ हजार ७९६ प्रवाशांकडून १० लाख रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. या मोहिमीचे पर्यवेक्षण सहाय्यक व्यावसायिक व्यवस्थापक हर्षित बसनोई आणि सहाय्यक व्यावसायिक व्यवस्थापक (तिकीट तपासणी) कल्पना बनसोडे यांनी केले.या मोहिमेस अनुसरून विभागीय रेल्वे व्यवस्थापक शैलेश गुप्ता म्हणाले, सोलापूर विभाग आपल्या प्रवाशांना आरामदायी आणि सोयीस्कर प्रवास सुनिश्चित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. त्यामुळे रेल्वे प्रवासी जनतेने वैध तिकिटांसह प्रवास करावा.

## मुलीची छेड काढली; जाब विचारले म्हणून मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर : मुलींची छेड काढल्याच्या जाब विचारल्याच्या कारणावरून लोखंडी फायटर आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणी एक जण जखमी झाला. ही घटना कुमठा नाका परिसरातील म्हेत्रे वस्ती येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. संतोष कुंडलिक कापुरे (वय ४५ रा. शिवगंगानगर भाग५, कुमठा नाका) असे जखमींचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना महेश चव्हाण आणि अन्य चौघांनी मारहाण केली. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.



## वेळापूर येथील शिबिरात ८७ जणांची तपासणी

✔ सुराज्य/वेळापूर

माळशिरस तालुक्यातील वेळापूर या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल पनासे यांच्यावतीने व सेवा सदन लाईफ लाईन सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल मिरज व सेवा सदन नेत्रालय मिरज यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये वेळापूर या ठिकाणी ८७ पेशंटची तपासणी करण्यात आली यामध्ये ऑपरेशन साठी आवश्यकता असणारे २५ पेशंट आढळून आले. अमोल पनासे व सेवासदन नेत्रालय मिरज यांच्यावतीने त्यांच्यावरती लवकरच मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये नेत्ररोग तज्ञ डॉक्टर साक्षी पाटील व डॉक्टर वैशाली वाटवे यांनी रुग्णांची तपासणी केली.

हे शिबिर प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी वेळापूर येथील पालखी चौकात असणाऱ्या श्रीकृष्ण पतसंस्था या ठिकाणी संपन्न होत आहे या शिबिराचा वेळापूर व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन अमोल पनासे यांनी केले आहे.

## रामोशी समाजातील जागेचा प्रश्न कायमचा सोडविणार : आ. शिंदे

कन्हेरगांव येथे नरवीर उमाजी नाईक यांची जयंती साजरी

✔ सुराज्य/कुर्डूवाडी



रामोशी समाज हा प्रामाणिकपणे, निष्ठेने काम करणारा समाज असून, या समाजातील गोरगरिबांच्या राहण्याच्या जागेच्या संदर्भातील विषयाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी लवकरच शासन दरबारी बैठक लावून त्यांच्या सर्व मागण्या पूर्ण करणार असल्याचे करमाळा तालुक्याचे आमदार संजयमामा शिंदे यांनी सांगितले.

कन्हेरगांव तालुका माढा येथे नरवीर उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जय मल्हार क्रांती संघटनेचे उपाध्यक्ष अंकुश जाधव होते. यावेळी विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे संचालक शिवाजी डोके, माजी सरपंच लिंबाजी मोरे, चेअरमन किसन खोचरे, माजी उपसरपंच धनंजय मोरे, हभप विष्णू महाराज डोके पाटील,

सरपंच दशरथ चव्हाण, उपसरपंच दिपक डोके, बाळासाहेब पाटील, बाबुराव डोके, उमेश डोके, उत्तम पाटील, संजय पाटील, पोलीस पाटील सदाशिव पाटील, संपत चव्हाण, समाधान चव्हाण, बापू जाधव, वैजनाथ चव्हाण, मल्हारी चव्हाण, दादासाहेब चव्हाण, भिमराव बोडरे, कुमार चव्हाण, उमेश चव्हाण, हनुमंत चव्हाण, आप्पासाहेब जाधव, अनिल चव्हाण, गणेश जाधव, गणेश चव्हाण, रामेश्वर चव्हाण, बिनु गुजले, सुधीर गुजले, महावीर गुजले, बापू जाधव, अभिलाल जाधव, सुरेश माने, तानाजी चव्हाण, सुनील चव्हाण, कुंडलीक चव्हाण, समीर चव्हाण आदी उपस्थित होते.

यावेळी जय मल्हार क्रांती संघटनेचे उपाध्यक्ष अंकुश जाधव यांनी रामोशी समाजातील जागेचा विषय कायमस्वरूपी संपवा अशी मागणी आमदार संजयमामा शिंदे यांच्याकडे केली. आभार संपत चव्हाण यांनी मांडले. तर प्रास्ताविक सरपंच दशरथ चव्हाण यांनी केले.




## रिपब्लिकन युवा सेनेतर्फे कलावंतांचा भीमसंदेश पुरस्काराने गौरव


✔ सुराज्य/औरंगाबाद

औरंगाबाद शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे दि. २५ स्पटेंबर रोजी, सोलापूर रिपब्लिकन युवासेना आयोजित प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे यांच्या अध्यक्षतेखाली दिग्गज कलावंतांना भीमसंदेश गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्राचे ख्यातनाम भीमशाहीर तथा सोलापूर चे सुपुत्र कालकथित मनोहर लोकरे यांच्या स्मरणार्थ, रिपब्लिकन युवा सेना सोलापुर जिल्हाध्यक्ष सर्पमित्र भीमसेन मनोहर लोकरे यांच्या वतीने या सन्मान सोहळयाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्राच्या ख्यातनाम गायिका कडुबाई खरात, शाहीर मेघानंद जाधव, शाहीर चरण जाधव, गीतकार धम्मा धनवे, गायक अजय देहाडे, भीम जन्मभूमी महू येथील ख्यातनाम गायक सुनील तायडे, सुप्रसिध्द संगीतकार हिरल कांबळे अशा दिग्गज कलावंतांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच सुप्रसिध्द एडिटर सनी साळवे, सागर नावकर, रील / सोशल मीडिया स्टार विनोद बेगटे, निशिगंधा (निशा) मगरे, पँथर संध्याताई खरे, यांना भीमसंदेश युवारत्न या विशेष पुरस्काराने सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. आहे कोणाचं योगदान लाल दिव्याच्या गाडीला या सुप्रसिध्द गीताचे गीतकार जेष्ठ गितकार रामचंद्र जानराव यांनी उद्घाटन केले. व प्रमुख पाहुणे म्हणून पँथर ग्रुपचे संस्थापक तथा सुप्रसिध्द सर्पमित्र आकाश जाधव यांची उपस्थिती लाभली. व्यासपीठावर औरंगाबाद पच्छीम जिल्हाध्यक्ष काकासाहेब गायकवाड, शहराध्यक्ष मिलिंद बनसोडे, युवा जिल्हाध्यक्ष राहुल कानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कलाकार समिती सोलापूरचे मा. अध्यक्ष तथा महाराष्ट्रातील सुप्रसिध्द सिनेगीतकार, गायक, संगीतकार, भीम संदेश गायन पार्टीचे प्रमुख तानसेन लोकरे, हिंगोली जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, मणेश पुंडगे, धम्मपाल रसाळ, सोलापूर युवा शहराध्यक्ष संतोष कांबळे, यांची प्रमुख उपस्थित होती.

## जिल्ह्यात एकही अहवाल पॉझिटिव्ह नाही

✔ सुराज्य/सोलापूर : शहर जिल्ह्यात एकही रुग्णांचा अहवाल पॉझिटिव्ह नाही तर जिल्ह्यात ३ जणांनी कोरोनावर मात केली आहे.



कोविड मुळे एकही रुग्णांचा मृत्यु झाला नाही. जिल्ह्यात ५७ कोविड रुग्णांवर उपचार सुरू असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

सोलापूर शहरात सोमवारी नवीन एकही रूग्णांची भर पडली नाही. एकूण रुग्ण संख्या ३४ हजार ४१४ इतकीच आहे. रुग्णालयातून बरे होऊन गेलेल्या बाधितांची संख्या ३२ हजार ८५१ इतकी झाली आहे. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या बाधितांची संख्या ५१ इतकी झाली आहे. यामध्ये २४ पुरुष, २७ महिलांचा समावेश आहे. आजपर्यंत मृतांची संख्या १ हजार ५१२ झाली आहे. यात ९६४ पुरुष व ५४८ महिलांचा समावेश आहे.

## पिलीव येथे सायकल बँकेतून १०० सायकलींचे वाटप



✔ सुराज्य/पिलीव : जिल्हा परिषद केंद्र शाळा पिलीव येथे पंचायत समिती माळशिरस तर्फे तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील १०० गरजू मुलीना सायकल बँक योजनेतून पिलीव येथे समारंभपूर्वक वाटप करण्यात आले या सायकल बँक वाटपाच उद्घाटन समारंभ सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला या आनंदमय सोहळ्याचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन दीप प्रज्वलन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, शिक्षणाधिकारी किरण लोहार, माळशिरसचे गटविकास अधिकारी विनायक गुळवे, जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, पिलीवचे सरपंच नितीन मोहिते, उपसरपंच सोनाली करमाळकर, माळशिरसचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, शालेय पोषण आहार अधीक्षक, हरिश राउत शिक्षण विस्ताराधिकारी प्रदीप करडे , शिक्षण विस्ताराधिकारी स्वामी मॅडम, शिक्षण विस्ताराधिकारी गोदावरी राठोड, विस्ताराधिकारी हर्षवर्धन नाचणे शिक्षण विस्ताराधिकारी मुलाणी या मान्यवरांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख यांनी केले.

न्यायालयाच्या आदेशानुसार

# महात्मा बसवेश्वर उद्यानाची आजपासून मोजणी

✔ सुराज्य/सोलापूर

जुळे सोलापुरातील नागरिकांसाठी नव्याने होणाऱ्या महात्मा बसवेश्वर उद्यानाची मोजणी न्यायालयाच्या आदेशानुसार करण्याचे आदेशात दिले होते. त्यानुसार मंगळवारी या उद्यानाची मोजणी होत आहे. माजी उपमहापौर राजेश काळे यांच्या मागणीनंतर आता या मोजणी दरम्यान आता म्हाडाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

जुळे सोलापुरात राजेश काळे यांच्या संकल्पनेतून बसवेश्वर उद्यानाची निर्मिती होत आहे. याचे उद्घाटनही करण्यात आले होते. मात्र त्यानंतर जागा मोजणी करताना संबंधित जागा मालक आणि महापालिकेत वाद झाल्याने हे उद्यान लांबवणीवर पडले होते. त्यानंतर उद्यानाच्या जागेची मोजणी न्यायालयाच्या आदेशानुसार करण्याचे आदेश देण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने आ. सुभाष देशमुख, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांचे वसुंधरा कला महाविद्यालय, माजी महापौर सुशीला आबुटे त्यांचे बंधू अनिल आबुटे यांच्यासह वानकर बंधूंना मोजणीच्या वेळी हाजीर होण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार मंगळवारपासून ही मोजणी सुरू राहणार आहेत. यावेळी नगर रचनाविभागाचे संभाजी शिंदे यांच्यासह बसवेश्वर समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, बसवेश्वर उद्यानाच्या जागेची मोजणी करत असताना म्हाडाच्यावतीने माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्या शाहू शिक्षण संस्था पंढरपूर यांना देण्यात आलेल्या भूखंडाचे मूळ मालक हे म्हाडा असल्याने त्यांनाही मोजणीच्या वेळेस बोलवणे गरजेचे आहे. त्यामुळे उपअभियंता पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ शाखा सोलापूर यांनाही मोजणी वेळेस हजर राहण्याचे आदेश द्यावेत, जेणेकरून मोजणी मध्ये कोणताही अडथळा येणार नाही, अशी मागणी माजी महापौर राजेश काळे यांनी केली होती. त्यानुसार या मोजणीदरम्यान म्हाडाचे अधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

### जुळे सोलापूरवासियांना आता खऱ्या अर्थाने न्याय मिळणार : काळे

बसवेश्वर उद्यान व्हावे, ही अनेक महिन्यांपासून नागरिकांची मागणी होती. कोर्ट कमिशन च्या माध्यमातून मोजणी होणार असल्याने कोणताही वाद-विवाद उद्भवण्याची शक्यता आता कमी झाली आहे. त्यामुळे या बसवेश्वर उद्यानाचा प्रश्न आता मार्गी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता या ऑक्सिजन पार्क आणि उद्यानामुळे खऱ्या अर्थाने आता जुळे सोलापूरवासियांना न्याय मिळणार आहे.



## जगन्नाथ घाडगे यांना उत्कृष्ट अभिनय पुरस्कार

**मोडनिंब** : ऑगस्ट आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल २०२२ या बहुभाषिक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात कोलदांडा या मराठी लघुचित्रपटातील सर्वोत्कृष्ट अभिनय पुरस्काराने माढा तालुक्यातील अरण(मोडनिंब)गावचे श्री.जगन्नाथ तुकाराम घाडगे (मालक)यांना माजी आमदार प्रकाशजी यलगुलवर, अध्यक्ष अखिल भारतीय नाट्य परिषद सोलापूर, माजी डायरेक्टर फिल्म सिटी मुंबई यांच्या हस्ते अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे माजी अध्यक्ष मेघराज राजेभोसले,जेष्ठ अभिनेत्री गौरी केंद्रे, सुप्रसिध्द लेखक शरणकुमार लिंबाळे, आविष्कार फिल्म्सचे अध्यक्ष तथा उपाध्यक्ष मराठी साहित्य परिषद सोलापूर विठ्ठल बडगंची, नक्षत्र फिल्म्सचे अध्यक्ष तथा सहकार्यवाहक मराठी नाट्य परिषद सोलापूर उपाध्यक्ष इंटरनॅशनल नाट्य कौंशील, सुमित फुलमामडी, चित्रपट संकलक दिनेश म्याना, बॉलीवूड अभिनेत्री रेझल शर्मा, मराठी अभिनेत्री सायली कांबळे फिल्म समीक्षक सतीश आढवळकर, फेस्टिव्हल डायरेक्टर चित्रपट निर्माते दिग्दर्शक श्रीदत्त माने यांचा उपस्थिती मध्ये घाडगे यांना हा सन्मान देऊन गौरविण्यात आले.



## तुळजापूरहून आणलेल्या ज्योतीचे उत्साहात स्वागत

**माळीनगर** : सोमवार दिनांक २६ रोजी शारदीय नवरात्र उत्सावास सुरूवात झाली असून घरोघरी घटस्थापना केली असून विविध ठिकाणी देवी मंदीरात रोशनाई, मोठी आरास करण्यात आली असून मंडळाच्या वतीने देवीची स्थापना करून धुमधडाक्यात घटस्थापना करण्यात आली. येथील महालक्ष्मी नवरात्र उत्सव बिजवडी रावबहाद्दूर गट नंबर ४ मंडळाच्या वतीने तुळजापूरहून मशाल ज्योत आणण्यात आली यामध्ये ४० देवीभक्त युवकांनी सहभाग घेतला. यावेळी महिला वर्गानी आरती ओवाळून स्वागत केले. नवरात्रीचे नऊ दिवस आरती तसेच परिसरातील आराधी, गोंधळी, पोतराज आदी मंडळाचे कार्यक्रम मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आले आहेत.याप्रसंगी महिला वर्गाची सकाळपासूनच लगबग पाहायला मिळत होती घटस्थापनेसाठी लागणारे साहित्य याची बाजारात मोठी रेलचेल होती.तसेच नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील माळीनगर, सवतगव्हाण, तांबवे,बिजवडी आदी पंचक्रोशीतील गावोगावी मंडळांनी देवीची स्थापना करून भक्तीमय वातावरण निर्माण केले आहे.

## वटवृक्ष मंदिरात घटस्थापनेने नवरात्रीस प्रारंभ

**अक्कलकोट** : येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात सालाबादाप्रमाणे नवरात्र महोत्सवा निमित्त देवीची स्थापना व घटस्थापना करण्यात आली. यानंतर मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते व मंदार पुजारी व व्यंकटेश पुजारी यांच्या मंत्रोच्चारात देवीची आरती करण्यात आली. याप्रसंगी बोलताना इंगळे यांनी वटवृक्ष मंदिरातील नवरात्र महोत्सवास प्राचीन परंपरा आहे. या नवरात्री महोत्सवास अनन्य साधारण असे महत्व आहे. नारीशक्तिच्या या उत्सवात अनेक माता, भगिनी या देवींचे दर्शन घेवून पावन होतात. या नवरात्र महोत्सव कालावधीत देवस्थानच्या वतीने ३ दिवसीय देवी महात्म्य या पोथीचे पारायण आयोजन करण्यात येते. दरवर्षी अनेक महीला भक्त या पारायण सेवेत सहभागी होतात. नवरात्र महोत्सवात देवी महात्म्य पोथीचे पारायण हे इच्छीत फलप्राप्ती करण्याचे भक्तीमार्ग आहे असे मनोदय व्यक्त केले. कोजागरी पौर्णिमेस देवस्थानकडुन महानैवेद्य दाखवून दुध प्रसाद वाटप होवून या उत्सवाची सांगता होते अशीही माहिती इंगळे यांनी दिली. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वला सरदेशमुख, संपतराव शिंदे, प्रा.शिवशरण अचलेर, बंडेराव घाटगे, अमर पाटील, स्वामीनाथ लोणारी, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, सागर गोंडाळ, महेश मस्कले, सिध्दाराम कुंभार, प्रदीप हिंडोळे, संतोष जमगे आदींसह देवीभक्त व स्वामी भक्त उपस्थित राहून देवींचे दर्शन घेतले.




## उळे येथे लम्पीचे एक हजार लसीकरण

**अक्कलकोट** : उळे ता. द सोलापूर येथे गाई आणि बैलांमध्ये वाढत असणाऱ्या लम्पी या संसर्गजन्य रोगाला आळा घालण्यासाठी व प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून लसीकरण महत्वाचे आहे. यासाठी उळे येथील पशुवैद्यकिय दवाखाना येथे लसीकरण शिबिराचे आयोजन लोकमंगल कृषि महाविद्यालय वडाळा येथील शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी आलेल्या कृषिदूतांनी केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी एक दिवस आगोदर गावातील नागरिकांना भेटून लम्पी या आजाराविषयी माहिती देत लसीकरणाचे महत्व पटवून दिले. यामुळे ग्रामस्थांचा लसीकरणाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद पहायला मिळाला. या शिबिरासाठी उळे येथील पशुवैद्यकिय डॉ. व्ही. व्ही. बडगिरे, अमर बिचल व सहाय्यक गणेश शिंदे यांनी मोलाचे सहकार्य केले. हे लसीकरण यशस्वी करण्यासाठी कृषिदूत गटप्रमुख शिवराज बिराजदार यांच्यासह रोहित साखरे, शुभम पाटील, अर्षद याअलीमदद, योगेश शिरसट, लखन फसके, प्रतिक गायकवाड, यांनी परिश्रम घेतले.

## पवार यांना तालुका स्तरीय पुरस्कार

**मोडनिंब** : येथील पत्रकार प्रथमेश रविंद्र पवार यांना मराठा सेवा संघाच्या माढा तालुकास्तरीय पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला.कुर्डुवाडी येथे मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिन सोहळ्याचे औचित्य साधून हा पुरस्कार देण्यात आला.यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हा अध्यक्ष सचिन जगताप, प्रभारी बाळासाहेब वागज, उद्योजक वासुदेव खंदारे, शशिकांत गिड्डे, प्रशांत गिड्डे, सूरज खंदारे, विक्रांत शेळके, पदाधिकारी व नागरिक आदी उपस्थित होते.

# नको उसाची चिंता, जयहिंद शुगरनी वाढवली गाळपाची क्षमता

## ▪ शेतकऱ्यांची गरज ओळखून दररोज होणार १२ हजार मेट्रीक टन गाळप

सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट तालुका व दक्षिण सोलापूर तालुक्यात विक्रमी उसाचे लागण झाल्याने आता बहुसंख्य शेतकरी बांधवांना यंदा उस वेळेवर जाईल की नाही यांची चिंता सध्या सतावत असतानाच आता आचेगाव येथील माळरानावर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उभारलेली जयहिंद शुगर गेल्या गळीत हंगामापासून उस उत्पादक शेतकर्यांच्या मदतीला धावून येताना दिसून येत आहे. कारण सध्या तालुक्यात समाधानकारक पाऊस झाल्याने यंदा उसाच्या क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे.अशा वेळी जयहिंद शूगरचे चेअरमन व कारखाना व्यवस्थापक मंडळानी उस उत्पादक शेतकर्यांना जणू धीर देताना दिसून येत आहेत.**

### ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान






शेतकरी बांधवांनो आता नको उसाची चिंता जयहिंद शुगर ने वाढवली गाळपाची क्षमता, म्हणत जयहिंद शूगरने साखर आयुक्तांकडून वाढीव गाळप क्षमतेबाबत रीतसर परवाना घेऊन तसेच तालुक्यातील शेतकऱ्यांची गरज ओळखून आता जयहिंद शूगरकडून दररोज १२ हजार मेट्रीक टन उसाचे गाळप करण्यात येणार असल्याने उस उत्पादक शेतकर्यामधून समाधान व्यक्त होत आहे.जयहिंद शूगरला उस उत्पादक शेतकर्यांचा प्रतिसाद वाढत असताना ही आजपर्यंत कारखान्याची गाळप क्षमता मात्र दररोज पाच हजार मेट्रीक टन इतकाच उस गाळप होत होता.यामुळे गाळप हंगाम संपताना ही अनेक शेतकर्यांचे उस शेतात शिल्लक राहत असे. म्हणून जयहिंद शूगरने शेतकर्यांची गरज ओळखून यंदा वाढीव गाळप क्षमतेने कारखाना हंगाम सुरु होणार आहे.यंदा तालुक्यात उसाचे क्षेत्र वाढले असताना ही उसाबाबत चिंता करण्याचे कारण नसल्याचे जयहिंद शुगर कडून उस उत्पादक शेतकर्यांना सांगताना दिसतात.

यंदा दररोज १२ हजार मेट्रीक टन प्रतिदिन गाळप क्षमता करून कमीत कमी दिवसात जास्तीत जास्त ऊसाचे गाळप करण्यात येणार आहे. जयहिंद परिवाराच्या वतीने घेतलेल्या या शेतकरी हिताच्या निर्णयाचे उस उत्पादक शेतकर्यामधून कौतुक होत आहे. कारखाना संकटात असताना ही नेहमीच जयहिंद शूगरकडून सामान्य शेतकऱ्याचे हित डोळ्यासमोर ठेवून आज पर्यंत उस उत्पादक शेतकर्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. जयहिंद शुगर ने सुरु केलेल्या इथेनॉल प्रकल्प, वीजनिर्मिती व साखर उत्पादनाच्या जोरावर यंदा टोळी अडवान्स,कामगर पगार, शेतकर्यांचा संपूर्ण उस बील अदा केला आहे. आता येत्या गळीत हंगामात १४ लाख मेट्रीक टन उस गाळपाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून जयहिंद शुगर चे चेअरमन गणेश माने-देशमुख, मुख्य व्यवस्थापक बब्रुवान माने-देशमुख, व्हाईस चेअरमन विक्रम पाटील व कारखाना व्यवस्थापक मंडळांनी अथक परिश्रम घेताना दिसून येत आहेत. अवर्षणग्रस्त अक्कलकोट तालुक्यात गेल्या तीन वर्षांपासून पावसाचे प्रमाण चांगला राहिल्याने तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी पुन्हा एखदा उस शेतीकडे वळताना दिसून येत आहेत.छोट्या पिकांना वारंवार अतिवृष्टी आणि रोगराईचा फटका बसत असल्याने छोटा शेतकरी ही उस शेती करताना दिसतात.यामुळेच अनेक भागात अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण होताना पहायला मिळत आहे. अशा वेळी जयहिंद शुगरकडून दररोज १२ हजार मेट्रीक टन उस गाळपाचा घेतलेला निर्णय हा नक्कीच शेतकर्यांच्या हिताचे ठरणार असल्याचे बोलले जात आहे.



## होमिओपॅथिक पदवी अभ्यासक्रमात 'आधुनिक औषधशास्त्र' विषयाचा समावेश

सुराज्य/अकलूज

राष्ट्रीय होमिओपॅथिक आयोग, नवी दिल्ली येथे होमिओपॅथिक पदवी अभ्यासक्रमाच्या सुधारीत मसुद्यामध्ये 'आधुनिक औषधशास्त्र' (मॉडर्न फार्माकालॉजी) हा विषय समाविष्ट केल्याबद्दल होमिओपॅथी राष्ट्रीय आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिलजी खुराना यांना होमिओपॅथीचे नेते डॉ.अरुण भस्मे यांच्या नेतृत्वाखाली भेटलेल्या शिष्टमंडळाने त्यांचे विशेष आभार मानले व नॅशनल फेडरेशन ऑफ होमिओपॅथीक कॉलेज संघटनेच्या वतीने त्यांना या सुधारणेबद्दल सहमती दर्शवली.

राष्ट्रीय होमिओपॅथिक आयोगाचे अधिनियम २०२०चे कलम ५५ (२) च्या तरतुदीनुसार संघटनेच्या वतीने त्यांना निवेदन देण्यात आले.या संदर्भात नागरिकांना काही सुचना करायच्या असतील तर ८ ऑक्टोबर २०२२ पर्यंत आयोगाच्या हशल.पलहसारळश्र.ले़ा या पत्त्यावर पाठवण्याचे आवाहन राष्ट्रीय होमिओपॅथिक आयोगाने केलेले आहे. मॉडर्न फार्माकालॉजी विषयाचा समावेश बी.एच.एम.एस.पदवी अभ्यासक्रमात करावा यासाठी होमिओपॅथीचे नेते डॉ. अरूण भस्मे व सहकारी यांनी आयोगाकडे सातत्याने पाठपुरावा केलेला होता. यासाठी डॉ. अरूण भस्मे यांनी सन २०१३ मध्ये नागपूर विधानभवनासमोर सलग १२ दिवस आमरण उपोषण करून तत्कालीन महाराष्ट्र सरकारला मॉडर्न फार्माकालॉजी अभ्यासक्रम होमिओपॅथिक डॉक्टरांना देण्यास भाग पाडले होते.

या शिष्टमंडळात डॉ.आनंद कुलकर्णी, डॉ. विरेंद्र कवीश्वर, डॉ. पी. वाय कुलकर्णी, डॉ.बाळासाहेब पवार, डॉ.बाळकृष्ण गायकवाड,डॉ. धनाजी बागल, डॉ.श्रीकांत कोकणी, डॉ. उत्तमराव महाजन, डॉ.अजय दहाड, डॉ.फारुख मोतीवाला डॉ. शुभांगी मगदूम, डॉ नंदिनी जोशी, डॉ.समीर पोळ, डॉ. देवेंद्र पाटील, डॉ.विजय दाभाडे, डॉ.आर. के. मिश्रा, डॉ.अनिरुध्द बिष्णोई, डॉ. जनकभाई मेहता, डॉ.अजय हुली, डॉ. राहुल पाटील, डॉ.कृष्णाजी केळकर, डॉ.महेंद्र गौशाल, डॉ.बामणे, डॉ.विनोद दद्रवर, डॉ.सईद अहमद, डॉ.रोशन, डॉ. प्रभू कुमार, डॉ.विमल कुमठ इ. उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय होमिओपॅथिक आयोगाच्या एज्युकेशन बोर्ड, इथिकल बोर्ड व रेटिंग बोर्डचे प्रेसिडेंट सर्वश्री डॉ. तारकेश्वर जैन, डॉ.पिनाकिन त्रिवेदी, डॉ. के.आर.जनार्धन व आयोगाचे सेक्रेटरी डॉ. संजय गुप्ता उपस्थित होते.

## मुंडफणेवाडी शाळेस जिल्हास्तरीय वृक्षमित्र पुरस्कार

सुराज्य/श्रीपूर

महाळुंग मुंडफणेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुंडफणेवाडी शाळेला यावर्षी मरवडे ता. मंगळवेढा येथील छत्रपती परिवाराचा व स्वर्गीय आप्पा खंडू मगरे सामाजिक ट्रस्ट यांच्यावतीने दिला जाणारा वृक्षमित्र पुरस्कार माजी शिक्षण संचालक दिनकर पाटील, शिक्षणाधिकारी किरण लोहार, माजी शिक्षणाधिकारी प्रदीप मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



महाळुंग मुंडफणेवाडी शाळेने मागील चार वर्षात शालेय परिसरात लावलेल्या वृक्षांची लागवड व संवर्धन, रवींद्रनाथ टागोर रोपवाटिका, शाळेतील प्रत्येक विद्यार्थी आपल्या घरी वृक्षाची लागवड, शाळेत भेट देणाऱ्या व्यक्ती शाळेच्या वतीने वृक्ष वाटप करण्यात येते.तसेच शाळेकडे येणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले आहे. या सर्वांची नोंद घेऊन शाळेला वृक्षमित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला.

तसेच कोरोना काळात ऑक्सिजन ची गरजेचे महत्त्व सर्वांना माहीत झाले. त्यासाठी शाळेने शालेय परिसरात ऑक्सिजन पार्क निर्माण केले. शालेय परिसरात तुळशीची रोपे लावली. आज पर्यंत शाळेच्या रोपवाटिकेतून ५०० वृक्षांचे वाटप करण्यात आले आहे. पुरस्कार स्वीकारण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश पाटील, चंद्रसेन चव्हाण व मुख्याध्यापक समीर लोणकर, अर्चना वाघ इत्यादी उपस्थित होते.

शाळेस वृक्षमित्र पुरस्कार मिळाल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, विस्तार अधिकारी हर्षवर्धन नाचणे, केंद्रप्रमुख नितीन साने यांनी अभिनंदन केले आहे.

## अनिल कोल्हटकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील गारवाड येथील जि प प्राथमिक शाळेत इंग्रजी विषयाचे अध्यापन करनारे शिक्षक अनिल ज्ञानदेव कोल्हटकर यांना त्यांनी केलेल्या शैक्षणीक, सामाजिक, अध्यात्मिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल, त्यांना २०२२ चा सहकार महर्षी शंकरराव मोहीते- पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार जय विजय पतसंस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थांपक सुभाष मिसाळ ,चेअरमन अशोक रुपनवर व संचालकच्या उपस्थित प्रदान करण्यात आला.

अनिल कोल्हटकर हे व्याख्याते, उत्तम सुत्रसंचालक,तसेच शैक्षणीक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला .त्यांना हा पुरस्कार मिळाल्या बदल विविध शैक्षणीक, सामाजिक, राजकीय, पत्रकार क्षेत्रातील मान्यवर यांच्या कडुन त्यांचे अभिनंदन होत आहे.

## अक्कलकोट बस स्टॅन्डवर पिण्याच्या पाण्यासाठी प्रवाशांचे हाल

### ▪ प्रवाशांना विकत घ्यावे लागते पाणी

> एसटी बस स्टँड मधील सार्वजनिक नळ कनेक्शन च्या तोट्या सध्या तुटल्या आहेत. नवीन तोट्या बसवून त्वरित प्रवाशांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करु
> **- रमेश मंथा,**
> आगार प्रमुख अक्कलकोट

**अक्कलकोट** : अक्कलकोट बस स्टॅन्डवर गेल्या अनेक वर्षांपासून महामंडळाचे सार्वजनिक नळ कनेक्शन बंद असल्याने विद्यार्थी, स्वामी भक्त, व्यापारी व आदी प्रवाशी यांना सध्या विकत पाणी घेऊन पाणी प्यावे लागत आहे. यंदा तालुक्यात सर्वत्र दमदार पाऊस होऊन तालुक्यातील सर्वच नदी, नाले, तलाव तुडूंब भरले असताना ही अक्कलकोट बस स्टॅन्डवर मात्र प्रवाशांना पाणी विकत घेऊन प्यावे लागत असल्याने नागरिकात संताप व्यक्त केला जात आहे.

यापूर्वी अक्कलकोट बस स्टँडवर दोन ठिकाणी महामंडळाचे सार्वजनिक नळ कनेक्शन चालू होते. मध्यंतरी कोरोना महामारीच्या काळात बस स्टँड मधील दुकानदार दुकानाचे नूतनीकरण करत असताना दुकानच्या दोन्ही ही बाजूला फ्लाऊड मारल्याने सध्या हे दोन्ही नळ कनेक्शन बंद झाले आहेत. दररोज हजारो स्वामी भक्त दर्शनासाठी अक्कलकोट तीर्थक्षेत्राला भेट देत असतात. याच बरोबर शालेय विद्यार्थी, व्यापारी, नोकरदार आदी प्रवाशी एस टी बसने प्रवास करत असतात. या सर्व प्रवाशांना सध्या अक्कलकोट बस स्टॅन्डवर विकत पाणी घेऊन आपली तहान भागवावी लागत आहे. बस स्टँडवर पाणी नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे तक्रार वाढत आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना मात्र बस स्टँडच्या दुसर्या मजल्यावर बोअरवेल च्या माध्यमातून पाण्याची सोयी करण्यात आली आहे.

परंतू बस स्टॅन्डवरील प्रवाशी मात्र पिण्याच्या पाण्यापासून वंचित असल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. सध्या पावसाळ्यात ही परिस्थिती आहे, पुढे उन्हाळ्यात मात्र प्रवाशांचे अधिकच हाल होणार असल्याचे बोलले जात आहे. प्रवाशांच्या पिण्याच्या पाण्याकडे मात्र एसटी महामंडळाचे दुर्लक्ष होत असल्याचे तक्रार दिवसेंदिवस वाढत आहेत.

## उद्या अकलूज येथे रिपाइं आठवले गटाच्या माळशिरस तालुका कार्यकारिणीची बैठक

सुराज्य/वेळापूर

RPI (A)

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचा ६६ वा वर्धापन दिन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष नामदार डॉ रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रिपाइं महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली भुसावळ या ठिकाणी साजरा होणार आहे.

या वर्धापन दिन कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका कार्यकारणीची नियोजनाची बैठक रिपाइं आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली अकलूज शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस पश्चिम महाराष्ट्र,जिल्हा पदाधिकारी, उपस्थित राहून मार्गदर्शन करण्यात आहेत. कार्यकर्त्यांनी बैठकीसाठी उपस्थित राहावे. असे आव्हान तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, सरचिटणीस मारुती खांडेकर, कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवा आघाडी तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, युवा आघाडी तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, युवा आघाडी कार्याध्यक्ष विनोद रणदिवे यांनी केले आहे.

# २८ लाख मे. टन गाळपाचे उद्दिष्ट : आ.बबनराव शिंदे

## विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे युनिट नं.१ व २ चा अग्निप्रदीपन

सुराज्य/कुर्डूवाडी

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि.युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब या कारखान्याच्या गाळप हंगामचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ सोमवार दि.२६ रोजी विठ्ठल कॉर्पोरेशनचे संस्थापक चेअरमन आ.संजयमामा शिंदे यांच्या हस्ते व संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

सोमवार दि.२६ रोजी विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि. च्या युनिट नं.१ पिंपळनेरचा सकाळी १० वा. व युनिट नं.२ करकंब चा दुपारी १२.२५ वा .चे शुभमुहुर्तावर गाळप हंगाम २०२२-२३ चा अनुक्रमे २२ वा




व ४ था बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ विठ्ठल कॉर्पोरेशनचे संस्थापक चेअरमन आ.संजयमामा शिंदे यांच्या हस्ते व संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरूवात कै.विठ्ठलराव शिंदे यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर येथे ऊस गाळप हंगाम २०२२-२३ मध्ये २२ लाख मे.टन गाळप करणेचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. या गाळप हंगामासाठी युनिट नं. १ कडे ३५ हजार ४४१ हेक्टर ऊस क्षेत्राची नोंद असून अंदाजे ३१ लाख मे.टन ऊस गळीतास उपलब्ध होईल. कारखान्याने प्रतिदिन गाळप क्षमतेएवढा उसाचा पुरवठा होण्यासाठी ८७४ ट्रक्स/ट्रॅक्टर्स, १५०० बैलगाडी व ९६५ ट्रॅक्टर टायरगाडीचे करार करण्यात आलेले आहेत. केंद्रशाससाने इथेनॉल उत्पादनास दिलेल्या प्रोत्साहनातंर्गत कारखान्याने सध्याचे डिस्टीलरी प्रकल्पाची क्षमता १५० केएलपीडीवरून २५० केएलपीडी पर्यंत विस्तारवाढ केलेली आहे. सदर नवीन १०० केएलपीडी डिस्टीलरी प्रकल्प नोव्हेंबर पासून कार्यान्वीत होणार असून या प्रकल्पातून उत्पादीत होणारे इथेनॉल ऑईल कंपन्यांना विक्री करण्यात येणार आहे.

> बॉयलर पुजन प्रसंगी युनिट नं.१ कडे सन २०२१-२२ गळीत हंगामामध्ये एकरी जास्तीत जास्त ऊस उत्पादन घेणारे ऊस उत्पादक सोमनाथ भास्कर हुलगे व त्यांच्या सुविद्य पत्नी दिपाली सोमनाथ हुलगे रा.बेंबळे व युनिट नं.२ कडे प्रकाश बापुराव पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी पद्मजादेवी प्रकाश पाटील रा.तुंगत यांच्या हस्ते सत्यनारायण महापुजा पार पडली.

चालू गळीत हंगामामध्ये ज्युस टू इथेनॉल उत्पादनासाठी भर देणार असल्याचे आ.बबनराव शिंदे यांनी याप्रसंगी सांगितले. तसेच विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे युनिट नं.२ करकंब येथे ६ लाख मे.टन गाळप करणेचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. या गाळप हंगामासाठी कारखान्याकडे ७ हजार ९०४ हेक्टर ऊस क्षेत्राची नोंद आहे.

# राणेंना सुप्रीम कोर्टाचा दणका

## अधीश बंगल्यातील अवैध बांधकाम पाडण्याचे आदेश

सुराज्य/नवी दिल्ली

**मुंबई उच्च न्यायालयाने जुहू येथील अधीश बंगल्यातील अनधिकृत बांधकाम तोडण्याचे आदेश दिले होते. या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका राणेंनी सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. यावर केंद्रीय मंत्री नारायण राणेंना सुप्रीम कोर्टाने दणका दिला आहे. अधीश बंगल्या प्रकरणातील याचिका न्यायालयाने फेटाळली आहे. यावेळी अधीश बंगल्यातील अवैध बांधकाम पाडण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत.**





**सुप्रीम कोर्टाचा निर्णय काय?**

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना सुप्रीम कोर्टाने मोठा धक्का दिला आहे. अधीश बंगल्यातील अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी हायकोर्टाने दिलेले आदेश सुप्रीम कोर्टाने कायम ठेवले आहेत. नारायण राणेंना येत्या दोन आठवड्यात स्वत: हून अनधिकृत बांधकाम पाडावे लागणार अथवा मुंबई महापालिकेस कारवाईची मुभा असणार आहे.

**मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश काय?**

काही दिवसांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने जुहू येथील अधीश बंगल्यातील अनधिकृत बांधकाम तोडण्याचे आदेश दिले होते. सीआरझेड कायदा आणि एफएसआयचे उल्लंघन केल्याचे हायकोर्टाला आढळले आहे. दोन आठवड्यात कारवाई करून अहवाल सादर करण्याचे निर्देश हायकोर्टाने मुंबई महापालिकेला दिले होते. या आदेशाविरोधात नारायण राणे यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती.

नेमके प्रकरण काय?

नारायण राणेंच्या मुंबईतील जुहू येथे अधिश नावाचा बंगला आहे. या बंगल्याबाबत अनधिकृत बांधकाम झाल्याची तक्रार होती. तारा रोडवर उभारण्यात आलेल्या या बंगल्याच्या बांधकामांमुळे सीआरझेड नियमांचे उल्लंघन होत असल्याची तक्रारीत म्हटले होते. माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष दौंडकर यांनी नारायण राणे यांच्या बंगल्यात अनधिकृत बांधकाम झाले असल्याची तक्रार यापूर्वीच मुंबई मनपाला केली होती. मात्र, आपल्या या तक्रारीनंतर कुठलीच कारवाई केली नसल्याचा आरोप संतोष दौंडकर यांनी केला होता.

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका राणेंनी सुप्रीम कोर्टात दाखल केली होती.

# सावंतांची हकालपट्टी करण्याची पटोलेंची मागणी

सुराज्य/मुंबई



**शिवसेनेचे बंडखोर नेते आणि राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी मराठा आरक्षणाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केलं आहे. या वक्तव्यावरून सावंत यांच्याविरोधात राज्यभरात टीकेची झोड उठली असून आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही संताप व्यक्त केला आहे.**

'मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी राज्यातील सर्वच पक्ष प्रयत्न करत असताना शिंदे-फडणवीस सरकारमधील आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी मराठ्यांना आरक्षणाची खाज सुटली आहे, असं अत्यंत आक्षेपार्ह व बेजबाबदार विधान केले आहे. तानाजी सावंत यांचे हे विधान मराठा समाजाची बदनामी करणारे व त्यांचा अपमान करणारे असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सावंत यांच्या विधानावर खुलासा करावा व बेताल वक्तव्य करणाऱ्या तानाजी सावंत यांची मंत्रिमंडळातून तात्काळ हकालपट्टी करावी,' अशी मागणीच नाना पटोले यांनी केली आहे.

नाना पटोले यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत तानाजी सावंत यांचा समाचार घेतला आहे. तसेच शिंदे-भाजप सरकारवरही निशाणा साधला आहे. 'मराठा आरक्षणाची मागणी मागील अनेक वर्षांपासून होत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी राज्यातून विविध संघटना, राजकीय पक्ष यांचे प्रयत्न सुरू आहेत. सरकारी पातळीवर व न्यायलयीन पातळीवरही हा लढा सुरू आहे. महाविकास आघाडी सरकारने मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. २०१४ साली काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारने मराठी समाजाला आरक्षण दिले होते. परंतु, त्यानंतर आलेल्या फडणवीस सरकारच्या निष्क्रियतेमुळे मराठा आरक्षण संपुष्टात आले. आजही हा प्रश्न सुटावा व मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न सुरू असताना राज्यातील एक मंत्री अशा प्रकारचे बेताल वक्तव्य करतो हे अत्यंत निषेधार्ह आहे,' अशा शब्दांत पटोले यांनी आपला रोष व्यक्त केला.

# तलावात ट्रॅक्टर उलटल्याने दहा जणांचा मृत्यू

## ३७ जण जखमी

सुराज्य/लखनऊ




लष्करातील उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊच्या ग्रामीण भागात एक भीषण दुर्घटना घडली आहे. सीतापूरहून उनाई देवी मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांचे ट्रॅक्टर ट्रॉलीसह तलावात उलटून १० जणांचा मृत्यू झाला. तर ३७ जण गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तलावातून बाहेर काढून जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याशिवाय तलावात आणखी काही लोक बुडाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या शोधासाठी एसडीआरएफचे सर्च ऑपरेशन सुरू आहे. ही घटना आज (सोमवार) सकाळी घडली. माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले होते.

पोलिसांनी सांगितले की, ट्रॅक्टर ट्रॉलीतील सर्व लोक सीतापूरहून आले होते आणि त्यांना उनाई देवी मंदिरात मुलाचे मुंडण करण्यासाठी जायचे होते. इटौंजाच्या तलावाजवळ चालकाचे ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटले आणि ट्रॅक्टर व ट्रॉली तलावात उलटली. त्यातील सर्व लोक तलावात पडले. यातील दहा जण ट्रॉलीखाली दबल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य ३७ जण जखमी झाल्याने स्थानिक लोक आणि एसडीआरएफ टीमने त्यांना बाहेर काढत रुग्णालयात दाखल केले.

# कर चोरी प्रकरणात अनिल अंबानींना दिलासा

सुराज्य/नवी दिल्ली

**भारतीय उद्योगपती अनिल अंबानींना कर चोरी प्रकरणात उच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. प्राप्तिकर विभागाने ४२० कोटींच्या कर चोरी प्रकरणात अनिल अंबानी यांना नोटीस बजावली होती. यावर १७ नोव्हेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने प्राप्तिकर विभागाला दिले आहेत. तोपर्यंत अंबानी यांच्यावर कारवाई न करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.**



स्विस बँकेच्या दोन खात्यांमध्ये असलेल्या ८१४ कोटींच्या बेहिशोबी मालमत्तेवर अंबानी यांनी ४२० कोटींचा कर चुकवल्याचा ठपका प्राप्तिकर विभागाने ठेवला आहे. याविरोधात अनिल अंबानी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. ८१४ कोटींची ही रक्कम काळा पैसा असल्याचा आरोप करण्यात येत आहे. अंबानी यांची बहामासमध्ये ड्रीमवर्क होल्डिंग्ज इंक' या नावाची कंपनी आहे. या कंपनीमधून आलेली रक्कम अनिल अंबानींची बेहिशेबी मालमत्ता असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, अनिल अंबानी यांनी मुद्दाम कर चुकवल्याचा आरोप प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. परदेशी बँक खात्यात जमा केलेल्या रकमेबद्दल प्राप्तिकर विभागाला माहिती दिली नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. याप्रकरणी ऑगस्ट महिन्यात अनिल अंबानी यांना नोटीस बजावण्यात आली होती.

# लहरी हवामानाचा फळांना फटका; द्राक्षांचे आगमन लांबणीवर

सुराज्य/पुणे

**लहरी हवामानामुळे यंदा द्राक्ष हंगाम दोन महिन्यांनी लांबणीवर पडणार आहे. दुसरीकडे, कडाक्याच्या उन्हामुळे मृग आणि अतिपावसामुळे अंबिया असे संत्र्यांचे दोन्ही बहर झडल्याने यंदा संत्री उत्पादनात ६० टक्क्यांहून अधिक घट झाली आहे.**



अतिवृष्टी, खराब हवामान आणि हवामानात वेगाने होत असलेल्या बदलांमुळे यंदा द्राक्षांचा हंगाम महिनाभराने लांबणीवर गेला आहे. नाशिक जिल्ह्यातील सटाणा, मालेगाव परिसर वगळता राज्यभरात कुठेही पूर्वहंगामी (अगाप) छाटण्या झाललेल्या नाहीत. त्यामुळे पुरेशी गोड द्राक्षे बाजारात येण्यास फेब्रुवारअखेर उजाडणार आहे.


नाशिक जिल्ह्यातील सटाणा, मालेगाव परिसरात पूर्वहंगामी छाटण्या होतात. सध्या तेथील द्राक्षांची वाढ शेंगदाण्याइतकी झाली आहे. ही द्राक्षे गोड नसतात, त्यांना खासकरून दक्षिण भारतात मागणी असते. या द्राक्षांची विक्री राज्यात अल्प प्रमाणात मॉलमधून होते.

नाशिकच्या पूर्वहंगामी छाटण्या वगळता, ऑगस्ट महिन्यात इंदापूर, तुळजापूर आणि तासगावच्या पूर्व भागात फळ छाटणी होते. सप्टेंबर अखेरपर्यंत राज्यातील सरासरी तीस टक्के द्राक्षबागाची छाटणी झालेली असते. पण, मागील दोन-तीन हंगामांत फटका बसल्यामुळे आणि यंदा पावसाचा जोर कायम असल्यामुळे आजअखेर द्राक्ष बागायतदार छाटणी करण्यास धजावताना दिसत नाहीत. फळ छाटणी झाल्यानंतर चार महिन्यांनंतर द्राक्षे बाजारात येण्यास सुरुवात होते.

यंदा ऑगस्ट महिन्यात छाटण्या झाल्या नाहीत. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे नोव्हेंबरअखेर बाजारात होणारी द्राक्षांची आवक यंदा होणार नाही. सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून राज्यात फळ छाटण्यांना वेग येईल आणि ही द्राक्षे जानेवारीअखेरीस बाजारात येतील.

# आझाद यांनी जाहीर केला नवा पक्ष

सुराज्य/नवी दिल्ली



काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यानंतर ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांनी नव्या पक्षाच्या स्थापनेची आज घोषणा केली आहे. डेमोक्रेटिक आझाद पार्टी' असे या नव्या पक्षाचे नाव आहे. तीन रंगांच्या धर्मनिरपेक्ष ध्वजाचेही आझाद यांच्याकडून अनावरण करण्यात आले आहे. काँग्रेसमधून सर्व पदांचा राजीनामा दिल्यानंतर नव्या पक्षाची स्थापना करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले होते.

दरम्यान, कार्यकर्त्यांकडून पक्षासाठी १५०० नावं सुचवण्यात आल्याचे आझाद यांनी म्हटले आहे. पक्षाचे नाव धर्म आणि संस्कृतीनुसार ठेवण्यात आल्याचे आझाद यांनी सांगितले आहे. देशभरातून पक्षासाठी १५०० नावांची यादी प्राप्त झाली होती. यामध्ये काही उर्दू आणि संस्कृत नावांचा समावेश होता.

सर्वांना समजेल असे नाव आम्हाला ठेवायचे होते. त्यानुसार डेमोक्रेटिक आझाद पार्टी' हे नाव ठेवण्यात आले आहे, असे आझाद म्हणाले आहेत.

# गोमातेमुळे सीएम, बीजेपी अडचणीत

## अनेक ठिकाणी गायी दिसतात रस्त्यावर फिरताना

सुराज्य/गुजरात



गुजरातमधील बनासकांठा जिल्ह्यामध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला स्थानिकांकडून जोरदार विरोध होताना दिसत आहे. विशेष म्हणजे हजारोंच्या संख्येने आपल्या गायी उपजिल्हाधिकाऱ्यांचं कार्यालयां बरोबरच न्यायालयासारख्या सरकारी इमारतींमध्ये सोडत स्थानिकांकडून भाजपाचा विरोध केला जात आहे. गायींच्या चाऱ्यासाठी आणि गोठ्यांच्या उभारणीसाठी सरकार पैसे देत नसल्याने या गाडी मोकाट सोडण्यात आल्या आहेत. गायींचं संगोपन करणाऱ्या आणि सरकारच्या निधीवर चालणाऱ्या संस्थांकडून या गाडी मोकाट सोडून देण्यात आल्यात. सोमवारपर्यंत अशा १ हजार ७५० गायी सोडून देण्यात आल्याची आकडेवारी समोर आली आहे. या जिल्ह्यामध्ये एकूण साडेचार लाख अशा गायी आहेत ज्या या संस्थांमार्फत संभाळल्या जातात. या संस्थांनाही आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्याने हा प्रश्न सत्ताधारी भाजपासाठी डोकेदुखी ठरु शकतो.

बनासकांठा जिल्ह्यामध्ये आगामी विधानसभा निवडणुकींमध्ये भाजपावर बहिष्कार टाकण्याच्या घोषणाबाजी करत गुरं सरकारी कार्यालयांच्या आवारात सोडली जात असल्याचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. गुजरातच्या उत्तरेकडील बनासकंठा आणि पाटण तालुक्यामध्ये गुरं मोकाट सोडून देण्यात आली आहे. कच्छ जिल्ह्यामध्येही या संस्थांनी हात वर केले असून या गोसंपोगन करणाऱ्या केंद्रांच्या चाव्या सरकारकडू सुपूर्द केल्या आहेत. आगामी निवडणुकींमध्ये आम्ही भाजपाला मतदान करणार नाही, असं या संस्थाचालकांचं म्हणणं आहे.

# राज्यात पोलिसांची २० हजार पदे भरणार

सुराज्य/मुंबई : राज्यात शिंदे-फडणवीस सरकारने तरुणांच्या दृष्टीने एक मोठा निर्णय घेतला आहे. मागील दोन वर्षापासून कोविड व अन्य कारणांमुळे रखडलेली पोलीस भरती आता राज्य सरकारकडून केली जाणार आहे. राज्यात आता तब्बल २० हजार पोलिसांची पदे भरली जाणार असल्याची माहिती आज(सोमवार) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: प्रसार माध्यमांना दिली.

एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मी घेतलेला आहे. तो म्हणजे दोन वर्षांची पोलीस भरती आता आम्ही हाती घेत आहोत. साधारणपणे पोलिसांची २० हजार पदे भरण्याचा आम्ही निर्णय घेतलेला आहे. असं फडणवीस यांनी जाहीर केलं आहे. याचबरोबर या संदर्भातील कार्यवाही आम्ही लवकरात लवकर करू. जवळपास साडेसात ते आठ हजार पदांची एक जाहिरात निघालेली आहे. अजून १२ हजार पदांची एक जाहिरात ही लवकरच आम्ही काढणार आहोत. त्यामुळे मोठ्याप्रमाणावर पोलीस भरती आम्ही करणार आहोत. मला असं वाटतं यामुळे पोलीस दलाला निश्चतपणे फायदा होईल. अशीही माहिती उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.


# तिरुपती देवस्थान मालामाल

## अबब...१४ हजार कोटींच्या ठेवी, १४ टन सोने, ८५ हजार कोटींची प्रॉपर्टी

सुराज्य/सोलापूर

जगातील श्रीमंत व्यक्ती कोण? याविषयीची स्पर्धा आपण दरवर्षी पाहात असतो. ती व्यक्ती श्रीमंत कशी झाली. किती कोटींची श्रीमंती त्याला लाभली? त्याविषयीची रसभरित चर्चा आपण ऐकत असतो. माणसांप्रमाणे देवादिकांमध्येही अलीकडे श्रीमंतीची स्पर्धा सुरू झालीय. कुठला देव किती श्रीमंत हेही आता जनतेला कळू लागले आहे. माणसांप्रमाणे देवही श्रीमंत होऊ लागले आहेत. भारतात सर्वात श्रीमंत देव म्हणजे कोण? असा प्रश्न विचारला तर अगदी लहानगाही सांगेल की, तिरूपतीचा श्री बालाजी. होय हे उत्तर योग्यच ठरेल. तिरूपती देवस्थानने त्यांची संपत्ती जाहीर केली आहे. ती ऐकून सामान्य लोकांच्या भुवया नक्कीच उंचावतील. विविध राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये १४ हजार कोटींहून अधिकच्या ठेवी,१४ टन सोन्याचा साठा आणि ८५ हजार कोटींची मालमत्ता,अशी सुबत्ता या





देवस्थानकडे आहे.

तिरुपती बालाजी देवस्थान देशातल्या श्रीमंत मंदिरांपैकी एक आहे. संपत्तीविषयी तिरुपती मंदिराचे चेअरमन वाय वी सुब्बा रेडी हे सांगतात की, देशात देवस्थानाच्या ९६० मालमत्ता आहेत. त्याची किंमत ८५ हजार ७०५ कोटी इतकी आहे. १९७४ ते २०१४ सालादरम्यान वेगवेगळ्या सरकारच्या अंतर्गत मंदिर समितीने ११३ मालमत्ता निकाली काढल्या. मात्र, २०१४ नंतर एकाही मालमत्तेची विक्री केली नाही.राज्य सरकारच्या निर्देशांचे पालन करुन मागील विश्वस्त मंडळाने दरवर्षी संपत्ती आणि मालमत्तेची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला होता. त्याप्रमाणे २०२१ साली पहिली तर, यंदा दुसरी श्वेतपत्रिका काढण्यात आली आहे. दोन्ही श्वेतपत्रिका तिरुपती देवस्थानच्या संकेतस्थळावर टाकण्यात आल्या आहेत.

### अजून कसली श्रीमंती हवी...

या देवस्थानाच्या विविध राष्ट्रीयकृत बँकांमध्ये १४ हजार कोटींहून अधिक रुपयांच्या ठेवी आहेत. तर, १४ टन सोन्याचा साठाही आहे. त्यामुळे तिरूपती बालाजी देवस्थान जगातील सर्वांत श्रीमंत मंदिर म्हणून संबोधले जाते. भारतभर पसरलेल्या या प्रॉपर्टीजची किंमत जवळपास ८५ हजार कोटींच्या घरात आहे. मात्र यापेक्षा जास्त याची मार्केट वॅल्यू असू शकते. याची एकंदरीत मार्केट वॅल्यू या किमतीपेक्षा दीडपड अधिक असू शकते. यात २ लाख कोटींची भर पडू शकते. असा अंदाज जाणकार सांगतात.

### अमेरिकेतही अवतार...

गेल्या पाच महिन्यात त्यांच्या हुंडीतली रक्कम जवळपास ७०० कोटी रुपये (एप्रिलचा आकडा) आहे. हे देवस्थान देशभरात सर्वत्र देवळांचे जाळे पसरवत आहे आणि अमेरिकेतही त्यांनी तिरुपती देवस्थानाची काही मंदिरे उघडली आहेत. देशातल्या ७ हजार १२३ एकरवर तिरुमाला तिरुपती देवस्थानाची मालकी आहे. तिरुपती देवस्थानने देशभरातल्या ११३ ठिकाणच्या जमिनी त्या त्या वेळच्या विश्वस्तांनी, त्या वेळच्या सरकारच्या मार्गदर्शनाखाली विकल्या. मात्र त्या का विकल्या गेल्या या प्रश्नाला ते निरुत्तर राहिले.

### दोन हजार कोटींचे बजेट

देवस्थानने २८ फेब्रुवारी २०२१ ला बजेट सादर केले. ते बजेट २ हजार ९३७ कोटींच्या घरात होते. २०२१ - २०२२ साठी मंदिर समितीनं २ हजार ९३७ कोटींच्या बजेटला मंजुरी दिली. मंदिरात २०२० - २१ मध्ये दानपेटी आणि अन्य देणग्यांमधून १ हजार १३१ कोटी रुपयांचे दान मिळाल्याचा अंदाज आहे. कुटीर दान योजनेद्वारे गैर-लाभाची संपत्ती आणि रिकाम्या कॉटेजसाठी १०० कोटी रुपयांच्या उत्पन्नाचा, तर ठेवींवरील व्याजातून ५३३ कोटी रुपये व्याज मिळण्याचा अंदाज आहे. तर प्रदासातून मिळालेली रक्कम ३७५ कोटी रुपयांच्या उत्पन्नाचा अंदाज आहे. दर्शनातून २१० कोटी रुपये, कल्याणटक्कामधून १३१ कोटी रुपयांच्या उत्पन्नाचा अंदाज त्यावेळी वर्तवला होता.


### लॉकडाऊनचा फटका...

कोरोना काळात लागू केलेल्या संचारबंदीमुळे देशाप्रमाणे या देवस्थानलाही मोठा आर्थिक फटका बसला.दर्शनच बंद ठेवल्यामुळे मंदिर सुने सुने होते. देणग्या बंद झाल्या होत्या. हुंडीतही ठणठणाट होता. या काळात देवस्थानला चणचण भासली.व्यवस्थापनावरचा खर्च भागवण्यासाठी देवस्थानला देणग्या मागण्याची नामुष्की ओढवली होती.

CMYK

# आई राजा उदे उदे




















१) तुळजापुरात आई तुळजाभवानीला विविध अलंकारांनी सजवण्यात आले होते. २) विजयलक्ष्मी नवरात्र मंडळाच्या देवीची आकर्षक मूर्ती ३) बाळीवेस येथील शक्तीपूजा मंडळाच्यावतीने काढण्यात आलेली मिरवणूक ४) रूपाभवनी मंदिरात पूजा करताना आ. विजयकुमार देशमुख. ५) वारद चाळीतील देवीच्या मिरवणूक प्रसंगी माजी मंत्री विजयकुमार देशमुख, आ. प्रणिती शिंदे, प्रकाश वाले, अमोल शिंदे, चेतन नरोटे व इतर. ६) नारायण तालीम मंडळाचे पदाधिकारी मिरवणुकीत लेझिमचा खेळ सादर करताना.

## शिवीगाळ केल्याच्या कारणावरून मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर** : शिवीगाळ केल्याच्या कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी राम अंबादास अवघडे (वय-४५,रा.आंबेडकर नगर, विजापूर नका झोपडपट्टी नंबर १) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सुरज मल्लेश यादव, छकुली, पिल्ली, राधा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. राम व त्यांचा मित्र महेश बनसोडे हे घरी जेवण करीत असताना महेश बनसोडे यांची पत्नी महेश यांना डबा देण्यासाठी आली होती. त्यावेळी तिला सुरज यादव राम यांचे घर दाखवण्याकरिता आला होता. त्यावेळी त्याने विनाकारण रामयांच्या आईस शिवीगाळ केली. याचा जाब विचारल्यावर वरील लोकांनी राम यास मारहाण आणि शिवीगाळ केली. तपास सहायक फौजदार वाल्मिकी हे करीत आहेत.

## कटिंग करायला गेलेला मुलगा घरी परतला नाही

**सोलापूर** : कटिंग करण्यासाठी गेलेला एक अल्पवयीन मुलगा घरी परत न आल्याची घटना दि.२५ सप्टेंबर रोजी सकाळी पावणे दहा ते दहा वाजण्याच्या दरम्यान क्लासिक हेअर दुकान जुनी मिल कंपाऊंड येथे घडली. याप्रकरणी गणेश बिराजी शिंगाडे (वय-४८, रा.जुनी मिल चाळ, सुपर मार्केट शेजारी सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. आदित्य गणेश शिंगाडे (वय-१७, रा.जुनी मिल चाळ) हा क्लासिक हेअर दुकान येथे कटिंग करण्यासाठी गेला होता. त्याला कोणीतरी संशयावरून घेऊन गेले असावे असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोह.पोळ हे करीत आहेत.

‘शिवप्रताप गरुडझेप’ विजयादशमीला येणार

## पंतप्रधान मोदींसह सर्व मंत्र्यांनी चित्रपट पहावा, यासाठी प्रयत्न करणार: खा. कोल्हे



**सुराज्य/सोलापूर**

आग्र्यातून सुटका’ या प्रसंगाकडे इतिहासाला कलाटणी देणारा प्रसंग म्हणून पाहिला जातो. या प्रसंगावर अधारित जगदंब क्रिएशन’ प्रस्तुत ’शिवप्रताप गरुडझेप’ हा भव्यदिव्य मराठी चित्रपट विजयादशमीच्या मुहूर्तावर,येत्या ५ ऑक्टोबरला प्रदर्शित होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, तसेच सर्व केंद्रीय मंत्री आणि खासदारांनी हा चित्रपट पाहावा, यासाठी प्रयत्न करणार आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार आणि चित्रपट निर्माते डॉ. अमोल कोल्हे यांनी सोलापुरात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

’जगदंब क्रिएशन’ प्रस्तुत आणि डॉ.अमोल रामसिंग कोल्हे निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन कार्तिक राजाराम केंढे यांनी केले आहे.औरंगजेबासारख्या धूर्त बादशहाला बेसावध ठेऊन शिवाजी महाराज त्यांच्या हातावर तुरी देऊन आग्र्याच्या नजरकैदेतून निसटले. महाराजांनी शिताफीने आग्र्यातील नजरकैदेतून करून घेतलेली सुटका हा शिवचरित्रातील विलक्षण अध्याय होता.

एखाद्या कथा-कादंबरीतच शोभावी, अशी ही घटना प्रत्यक्षात घडवून आणणे, हे एका अतिशय बुद्धिमान आणि सावध व्यक्तीलाच शक्य होते, हे भावी पिढ्यांना दाखवून देण्याचा प्रयत्न झाला असल्याचे डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रारंभी सांगितले. आग्र्यात राजे छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, तेथील लालकिल्ल्यात या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी भव्य ७ सेट्स उभारण्यात आले होते.त्याद्वारे प्रत्येक कृतीला अगदी भव्यतेने साकारण्याचा प्रयत्न झाला आहे. हा चित्रपट सिनेरसिकांच्या चिरकाल स्मरणात राहिल, असे कोल्हे यांनी सांगितले. उत्तर भारतीय मित्राने विचारलेल्या प्रश्नातून या चित्रपटाची निर्मिती झाल्याचे डॉ.कोल्हे यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

**हे असणार कलाकार :** या चित्रपटात डॉ.अमोल कोल्हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत असून त्यांच्यासोबत यतीन कार्येकर, प्रतीक्षा लोणकर, हरक अमोल भारतीय, शैलेश दातार, हरीश दुधाडे, मनवा नाईक, पल्लवी वैद्य,अजय तपकिरे, रमेश रोकडे, अलका बडोला कौशल आदी ईराणी, विश्वजीत फडते आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. डॉ.अमोल कोल्हे, विलास सावंत, सोनाली घनश्याम राव, चंद्रशेखर ढवळीकर, कार्तिक राजाराम केंढे हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. प्रफुल्ल तावरे सहनिर्माते आहेत. मानकामे कार्यकारी निर्माते आहेत. छायाचित्रण संजय जाधव यांचे असून संकलन पीटर गुंड्रा यांचं आहे.

## रूपाभवानी मंदिर परिसरातील खुल्या जागांचा लिलाव

### पालिकेला १० दिवसांसाठी मिळणार ७० हजार रुपये

**सोलापूर** : नवरात्र महोत्सवात दहा दिवसांसाठी रूपा भवानी मंदिर परिसरातील पीएचइ बिल्डिंग, कचरा डम्पिंग स्टेशन या ठिकाणच्या खुल्या ५ जागांची ऑफलाइन लिलाव प्रक्रिया पार पडली. दहा दिवसांसाठी या जागेच्या माध्यमातून महापालिकेला ७० हजार रुपयांचे भाड्यापोटी उत्पन्न मिळणार आहे.

रुपाभवानीमंदिरपरिसरातील पीएचई बिल्डिंग कचरा डंपिंग स्टेशन या ठिकाणी असलेल्या खुल्या पाच जागा बोली लिलाव पद्धतीने दहा दिवसांसाठी देण्यात आल्या. महापालिकेच्या भूमी व मालमत्ता विभागाकडून हा लिलाव करण्यात आला. लहान मुलांसाठी खेळणी, विविध वस्तू ठेवण्यासाठी एक हजार स्क्वेअर फुटाची जागा लिलाव करण्यात आली. यामध्ये ७ हजार ते २७ हजारापर्यंत लिलाव झालेला असून यातून महापालिकेला दहा दिवसांसाठी ७० हजाराचे उत्पन्न मिळणार आहे. अनेक वर्षांपासून रूपा भवानी मंदिर परिसरातील खुली जागा महापालिका दहा दिवसासाठी भाडेतत्त्वावर देते. मात्र गेल्या दोन वर्षांपासून कोरोना महामारीमुळे नवरात्र महोत्सव साजरा करता आला नाही. परिसराची जागा रुपा भवानी मंदिर ट्रस्टसाठी महापालिकेने भाडेतत्त्वावर देत असताना दरवर्षी दहा टक्के प्रमाणे भाडेवाढ करत आहे. ही भाडेवाढ करू नये अशी मागणी करण्यात आली होती. यावेळी सहाय्यक आयुक्त विक्रमसिंह पाटील, भूमापन अधिकारी पुजारी, यल्लापा पूजारी, रूपा भवानी ट्रस्टी मंडळाचे अध्यक्ष मल्लिनाथ लातूरे, संताजी भोळे, रवी हक्के, जगन्नाथ बंडगर, नागराज डबरे, कोळेकर, लातूरे आदी उपस्थिती होते.

## तानाजी सावंत यांना आवर घालावा : धैर्यशील

**सुराज्य/अकलूज**

मंत्री तानाजी सावंत बेताल वक्तव्य करून मराठा समाजाच्या भावना दुखावत आहेत त्यांना तात्काळ तंबी देऊन आवर घालावा, अशी मागणी धैर्यशील मोहिते पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठा समाजातील समाज बांधव म्हणून आपण राज्याच्या प्रमुखपदी विराजमान झाला त्याबद्दल आपणास मनपूर्वक शुभेच्छा. आपले सर्वसामान्य जनतेचे सरकार राज्यात आले म्हणून जनता देखील खऱ्या अर्थाने आपले सरकार म्हणू लागली. परंतु मंत्री तानाजी सावंत यांच्या मराठा आरक्षणाच्या बेताल वक्तव्याने आपल्या सरकारच्या प्रतिमेस तडा जात आहे. सावंत यांनी सत्तांतर झाले की लगेच आरक्षणाची खाज सुटली असे वक्तव्य करून मराठा समाजाच्या भावनांचा अश्लाघ्य भाषेत उपमर्द करून समाजाचा अपमान केला आहे, राज्यातील मराठा संघटना कायदेशीर कक्षात बसणारे आरक्षण मागत आहेत तर काही संघटना या ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजास आरक्षण द्या म्हणून मागणी करत आहेत,ओबीसी मधूनच आरक्षण द्या ही कोणत्याही एका पक्षाची भूमिका नाही समाजातील सर्व घटक संघटना आपआपल्या स्तरावर विविध भूमिका घेऊन आरक्षणाची लढाई लढत आहे या



सर्वांच्या भूमिकेचा भावनांचा, उपमर्द न करता सामंजस्यपूर्ण आश्वस्त करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्रत राजकीय सत्तांतर झाले म्हणून मराठा समाजाने विरोधी पक्षाच्या सांगण्यावरून आंदोलन सुरू केले सांगणे म्हणजे मंत्री सावंत यांनी मराठा समाजावर आरोप करण्यासारखा आहे. आज ओबीसी मधून आरक्षण मागताय उद्या एस सी मधून मागाल परंतू वास्तविक एस सी मधून आरक्षण द्या अशी भूमिका मराठा समाजाने कधीच घेतली नव्हती आणि भविष्यातही कधी घेणारही नाही. त्यामुळे असले काही बोलून सामाजिक तेढ मंत्री सावंत वाढवत आहेत.यासाठी मुख्यमंत्री महोदय यांनी स्वतः लक्ष देऊन मंत्री सावंत यांनी केलेल्या चुकीच्या वक्तव्या बाबत तंबी देऊन आवर घालावी अशी विनंती धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्रात गुणवत्तापूर्वक पाणीपुरवठ्याचा प्रकल्प यशस्वी : आयुक्त शिवशंकर

### ■ भवानी पेठ, पाकणी येथेही लवकरच सुरू करणार

**सुराज्य/सोलापूर**

जर्मनीच्या तंत्रज्ञानावर आधारित गुणवत्तापूर्वक पाण्याचा प्रायोगिक तत्वावरील प्रकल्प सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्रात यशस्वी झाल्याने आता लवकरच शहरातील भवानी पेठ, पाकणी येथेही यंत्रणा बसविण्यत येईल. परिणामी संपूर्ण शहराला गुणवत्तापूर्वक पाण्याचा पुरवठा होईल, अशी माहिती महापालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर महापालिका व जर्मनीतील बाडनवुदमबर्ग प्रांत यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत सोमवारी सोलापुरात विभागीय पाणी परिषद घेण्यात आली. या परिषदेत गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करण्याबाबतचे अत्याधुनिक तंत्रज्ञान, त्यासंदर्भातील मशिनरी, उपकरणे आदींबाबत सादरीकरण करण्यात आले. करारांतर्गत वर्षभरापूर्वी जर्मनीने सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्रामध्ये वॉटर क्वालिटी मॉनेटरिंग सिस्टीम बसविली होती. कच्च्या पाण्यातील जड धातू, कॉपर लेवल आदी गोष्टी तपासून त्यावर योग्य प्रक्रिया करुन गुणवत्तापूर्वक पाण्याची निर्मिती करण्याबाबतचा हा सुमारे एक कोटींचा प्रकल्प जर्मनीकडून सोलापूरकरिता होता. हा प्रायोगिक तत्वावरील प्रकल्प यशस्वी झाल्याने आता महापालिकेच्या पाकणी व भवानी पेठ जलशुद्धीकरण केंद्रावरदेखील असा यंत्रणा बसविण्यात येणार आहे. याबाबत लवकरच निविदा मागविण्यात येणार आहे. यामुळे भावी काळात शहरवासीयांना गुणवत्तापूर्वक पाण्याचा पुरवठा केला जाईल, असे आयुक्त शिवशंकर यांनी सांगितले. या परिषदेला आयुक्त पी. शिवशंकर, अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, जर्मनी सरकारमधील अधिकारी ऑलिवर मगिरा, तज्ञ मार्क बॅकेट, जर्मनीतील औद्योगिक संघटनेचे डॉ. स्मिथ, जर्मन कंपनीचे व्यवस्थापक अशोक श्रीनिवासन, जर्मनी व भारताचे समन्वयक आशिष पंडित, जयंत वराडे, किशोर अष्टेकर, सोलापूरच्या वंशी लॅबचे रेड्डी, चिंचोळी सीईटीपीचे डॉ. श्रीकांत पवार, आर्किड कॉलेजचे प्रा. डॉ. श्रीनिवास मेतन आदी उपस्थित होते.



**प्रति ३० मिनिटांनी पाण्याच्या गुणवत्तेची नोंद**

महापालिका व जर्मनीतील बाडनवुदमबर्ग प्रांत यांच्यात २०२० मध्ये सामंजस्य करार झाला होता. या करारानुसार सोलापुरातील सोरेगाव जलशुध्दीकरण केंद्राची निवड करण्यात आली. या केंद्रावर जर्मन सरकारने १ कोटी रुपये खर्चून स्मार्ट वॉटर क्वालिटी मॉनेटरींग सिस्टिम बसविले आहे. वर्षभरापूर्वी ही सिस्टिम कार्यान्वित झाली. सोलापूर महापालिकेसह जर्मन सरकारला या पाण्याचा प्रति दिवस नव्हे, प्रति ३० मिनिटांनी पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल ऑनलाईनद्वारे प्राप्त मिळत होता. त्यामुळे पाण्याच्या शुध्दतेचे पॅरामीटर ठरविण्यास हे तंत्रज्ञान अधिक प्रभावी ठरले आहे.